रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ८०
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, ७ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### एमपीएससीकडून ९३८ पदांच्या भरतीसाठी पूर्व परीक्षा होणार



**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी)कडून महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. या जाहिरातीद्वारे ९३८ पदांच्या भरतीसाठी पूर्व परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षा ४ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग उद्योग निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक आणि लिपीक टंकलेखक पदाच्या भरतीसाठी ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे. उद्योग निरीक्षक पदाच्या नऊ जागा भरल्या जाणार आहेत. तांत्रिक सहायक पदाच्या चार जागा, कर सहायक ७३ जागा आणि लिपिक टंकलेखक पदाच्या ८५२ जागांसाठी ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे. महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुरुवात ७ ऑक्टोबरला होईल. तर, अर्ज सादर करण्याचा अखेरचा २७ ऑक्टोबर असेल.

## अंतरंग

जेएनपीएत कंटेनरमधून २३ कोटींचा ई-कचरा जप्त/३
रायगडमध्ये आरएसएसच्या शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम/७
पोलीस क्रीडा स्पर्धेसाठी सुभाष पाटील, तेजस माळी यांची निवड/८

# राज्यातील २४७ नगरपालिका, १४७ नगरपंचायतींसाठी आरक्षण जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही दिवसात जाहीर होणार आहेत. निवडणूक आयोगाने जोरदार तयारी सुरू केली आहे. राज्यातील २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण सोडत जाहीर झाले आहे. राज्यातील ६७ नगर परिषदांच्या अध्यक्षपद ओबीसींसाठी जाहीर झाले आहे ६७ नगर परिषदपैकी ३४ ओबीसी महिलासाठी आरक्षित करण्यात आले. दरम्यान, महाराष्ट्रातील ६८ नगर परिषदा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.

एकूण ७४ जागा राखीव आहेत, यामधील सर्वसाधारण महिलांसाठी ३८ जागा अनुसूचित जातीसाठी तर ७ जागा अनुसूचित जमातीसाठी तसेच २० जागा मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

नगराध्यक्षपद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव असणार, यावर स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे ठरत असतात. त्यामुळे आजच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षण सोडतीकडे राजकीय वर्तुळाच्या नजरा लागल्या होत्या. आतापर्यंत जाहीर झालेल्या सोडतीनुसार, १६ नगर परिषदांमध्ये नगराध्यक्षपद अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव असेल. तर ३४ नगर परिषदांमध्ये नगराध्यक्षपद हे ओबीसी महिलांसाठी आणि ६७



### अध्यक्षपदासाठी जोरदार चुरस

नगर परिषदांधील नगराध्यक्षपद हे खुल्या प्रवर्गाच्या महिलांसाठी राखीव असेल. खुल्या प्रवर्गासाठी नगराध्यक्षपद आरक्षित असलेल्या नगरपरिषदांमध्ये गंगाखेड, बार्शी, अंबड, उरण, बुलढाणा, कळमनुरी या नगरपरिषदांचा समावेश आहे.

**६८ नगर परिषदा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव**

परळी वैजनाथ, मुखेड, अंबरनाथ, अचलपूर, मुदखेड, पवनी, कन्नड, मलकापूर, मोवाड, पंढरपूर, खामगाव, गंगाखेड, धरणगाव, बार्शी, अंबड, गेवराई, म्हसवड, गडचिरोली, भंडारा, उरण, बुलढाणा, पैठण, कारंजा, नांदुरा, सावनेर, मंगळवेढा, कळमनुरी, आर्वी, किनवट, कागल, संगमनेर, मुरगुड, साकोली, कुरूंदवाड, पूर्णा, कळंब, चांदूररेल्वे, चांदूरबाजार, भूम, रत्नागिरी, रहिमतपूर, खेड, करमाळा, वसमत, हिंगणघाट, रावेर, जामनेर, पलूस, यावल, सावंतवाडी, जव्हार, तासगाव, राजापूर, जामखेड, चाकण, शेवगाव, लोणार, हदगाव, पन्हाळा, धर्माबाद, उमरखेड, मानवत, पाचोरा, पाचोरा, पेण, फैजपूर, उदगीर, अलिबाग.

**एससी महिलांसाठी राखीव नगराध्यक्षपद**

देऊळगावराजा, मोहोळ, तेल्हारा, ओझर, वानाडोंगरी, भुसावळ, शिर्डी, सावदा, चिमूर, दिग्रस, अकलूज, बीड, शिरोळ, घुग्गूस, मैनदर्गी, दिगडोहदेवी.

**ओबीसी महिलांसाठी राखीव नगराध्यक्षपद**

भगूर, इगतपुरी, विटा, धाराशिव, भोकरदन, जुन्नर, उमरेड, दौंड, कुळगाव-बदलापूर, हिंगोली, फुलगाव, मुरूड-जंजिरा, काटोल, माजलगाव, मूल, मालवण, देसाईगंज, हिवरखेड, अकोट, मोर्शी, नेर-नवाबपूर, औसा, कर्जत, देगलूर, चोपडा, सटाणा, बाळापूर, रोहा, धामणगाव रेल्वे, वरोरा.

### रायगडातील १० जागा महिलांसाठी राखीव



**अलिबाग :** रायगड जिल्ह्यातील १० ठिकाणी नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव आले आहे. दोन ठिकाणी अनुसूचित जमातीसाठी नगराध्यक्षपद राखीव झाले आहे. दोन नगरपंचायतींचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी राखीव आहे. अनुसूचित जातीसाठी एकही नगराध्यक्षपद राखीव नाही. जिल्ह्यातील १० नगर परिषद आणि ६ नगर पंचायती आहेत. त्यांच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सोमवारी जाहीर आले. सहा नगर परिषदेवर तर चार नगरपंचायतीवर महिलाराज असणार आहे.

**असे आहे आरक्षण**

*(नगर परिषद) सर्वसाधारण महिला अलिबाग, पेण, उरण; ओबीसी महिला मुरूड जंजिरा, कर्जत, रोहा; मागास प्रवर्ग महाड, श्रीवर्धन; सर्वसाधारण खोपोली, माथेरान (नगरपंचायती) ओबीसी महिला खालापूर, पोलादपूर; अनुसूचित जमाती महिला पाली, अनुसूचित जमाती माणगाव, मागास प्रवर्ग तळा, सर्वसाधारण महिला म्हसळा.*

# लोकनेते 'दिबां'चा वारसा पुढे नेऊया -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि.बा. पाटीलसाहेबांनी दिलेला वारसा आपल्याला पुढे चालवायचा आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिवाजीनगर येथे विविध विकास कामांच्या शुभारंभावेळी केले.

दानशूर व्यक्तीमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नागरीकांना भेडसवण्यासा समस्या मार्गी लावावल्यात यासाठी नेहमीच पुढाकार घेत अनेक विकासाची कामे केली आहेत. त्यानुसार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या स्वनिधीतुन पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर गावातील रस्त्याचे काँक्रिटीकरण, अंतर्गत आर.सी.सी. गटार आणि नविन पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्यात आली आहे. या सर्व कामांचे उद्घाटन आणि शिवाजीनगर गावाची बांधण्यात येणाऱ्या कमानीचे भुमीपूजन भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. ६) झाले.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, लोकनेते दि. बा. पाटील आणि स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी दिलेल्या संस्कारातून आम्ही घडलो आणि मोठे झालो. त्यांनीच आम्हाला चांगले कार्य करण्याच्या सवयी लावल्या असल्याचे सांगून त्यांनी जे आंदोलनाचे बीज रोवले ते आम्ही अजूनही चालु ठेवलं आहे असे प्रतिपादन केले. तसेच ज्या प्रकारची विकासाची कामे आत्ता पर्यंत झाली तशीच कामे येणाऱ्या काळातही करत राहणार, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय टी देशमुख, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, हेमंत ठाकूर, सचिन घरत, रतन भगत, विश्वनाथ कोळी, वसंतशेठ पाटील, जयवंत देशमुख, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, सागर ठाकूर, सी एल ठाकूर, सुधीर ठाकूर, मीनाक्षी पाटील, रमाकांत म्हात्रे, राजकिरण कोळी, नंदा ठाकूर, शशिकांत ठाकूर, सागर ठाकूर, कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, नरेश मोकळ, गव्हाण ग्रामपंचायत प्रशासक महेश घबाडी, विजय कुमार राठोड, गजानन ठाकूर, विजय ठाकूर, सुजित ठाकूर, किशोर ठाकूर, धनंजय ठाकूर, किशोर पाटील, शनिदास ठाकूर, श्रीराम ठाकूर, शशिकांत ठाकूर, चिंतामण ठाकूर यांच्यासह पंच कमिटी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. (पान २ वर..)




### गव्हाण परिसरात अनेक विकासकामे -आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, गव्हाण परिसरामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेते या भुमीकेतून अनेक विकास कामे केली. जिथे सरकारचा निधी उपलब्ध होऊ शकत नाही त्या ठिकाणी ठिकाणी लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांनी पुढाकार घेऊन विभागाचा विकास केला. आपल्या परिसरामधील सर्व शाळा चांगल्या दर्जाच्या असल्या पाहिजेत त्याठिकाणी चांगले शिक्षण मिळाले पाहजे यासाठी आवश्यक ती ताकद लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी लावली आहे. जे आपण करून ते चांगले आणि उत्तम झाले पाहिजे ही भावना त्यांनी ठेवली आहे. आणि हे करत असताना आपल्या गावचा विसर कधीही पडू दिला नाही त्यामुळे आपल्या परिसरामध्ये विकास कामे झाली पहिजे आपल्या परसिरातील समस्या मार्गी लागली पाहिजेत यासाठी सातत्याने ते दक्ष असतात, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## निवडक

### कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा

**मुंबई :** शक्ती चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून राज्यात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्ह्यासह कोकण किनारपट्टीवरील सर्वच जिल्ह्यांना हवामान विभागाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. कोकण किनारपट्टी आणि मुंबईला या चक्रीवादळाचा फटका बसू शकतो असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

### मेट्रो-५साठी एमएमआरडीए २२ गाड्या खरेदी करणार

**मुंबई :** 'ठाणे-कल्याण-भिवंडी मेट्रो ५' मार्गिकेसाठी एमएमआरडीएने २२ गाड्या खरेदी करण्यासाठी फेब्रुवारी २०२४ मध्ये निविदा मागविल्या होत्या. गाड्यांच्या खरेदीसाठी कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे. टिटागढ रेल सिस्टीमला हे कंत्राट देण्यात आले असून २ हजार ६४० कोटी रुपये खर्च करून मेट्रो ५ साठी २२ गाड्या खरेदी होणार आहेत.

# खालापूरातील कार्यकर्ते भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मानकिवली येथील अनेक उत्साही युवा कार्यकर्त्यांनी रविवारी (दि.५) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर आणि राष्ट्रहितवादी धोरणांवर विश्वास ठेवत या तरुणांनी भाजपमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला.

या वेळी नरेश देशमुख, सचिन देशमुख, निखिल देशमुख, तेजस देशमुख, निलेश देशमुख, समीर देशमुख, नितीन देशमुख, रोहिदास चौधरी, प्रमोद देशमुख, प्रवीण देशमुख, उल्हास देशमुख, भानुदास देशमुख, चिंतामणी देशमुख, गणेश देशमुख, ऋषिकेश देशमुख आणि कौस्तुभ देशमुख यांसारख्या अनेक युवकांनी भाजपमध्ये सहभागी होउन आपली निष्ठा व्यक्त केली.

पनवेल येथील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्यासह स्थानिक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



# नवी मुंबई विमानतळ उद्घाटनाच्या तयारीचा भाजप प्रदेशाध्यक्षांकडून आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर रोजी दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे भव्य उद्घाटन होणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विमानतळाच्या परिसराची सोमवारी (दि.६) पाहणी करून पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेतला.



या पाहणीदरम्यान भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील तसेच पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे उपस्थित होते.

या वेळी त्यांनी विमानतळ परिसरातील विविध कामांची पाहणी करून सोहळ्याच्या आयोजनासंदर्भात सुरक्षा, वाहतूक व्यवस्था, तसेच लोकांच्या उपस्थितीच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या तयारीचा सखोल आढावा घेतला. दि. बा. पाटील विमानतळाचे उद्घाटन हा नवी मुंबई व रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी नवा अध्याय ठरणार असून, या सोहळ्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# बाजारपेठेत आकाशकंदील दाखल

**पनवेल : वार्ताहर**

सणांचा राजा असलेल्या दिवाळीच्या तयारीसाठी साऱ्यांची लगबग सुरू झाली असून विविध वस्तू खरेदीसाठी बाजारात ग्राहकांची मोठी गर्दी होऊ लागली आहे. यानिमित्ताने बाजारात चैतन्य निर्माण झाले आहे. प्रकाशाचा उत्सव असलेल्या या सणानिमित्त आकाश कंदील, पणत्यांची दुकाने जागोजागी थाटली आहे. हे आकर्षक आकाशकंदील लक्ष वेधून घेत असून यावर्षी आकाश कंदीलांचे पारंपारिक आणि काही नवे प्रकारही बाजारात दाखल झाले आहेत.

दिवाळीला अवघे काही दिवस शिल्लक राहिले असून पनवेल परिसरातील अनेक कुटुंबीय दिवसरात्र जागरण करीत इको फ्रेंडली आकाश कंदील तयार करण्याचे काम करीत आहेत . सुमारे दशकभरापासून अनेक कुटुंबीय तयार करीत असलेल्या आकाशकंदिलांना पनवेलसह



परिसरातील पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करणाऱ्यांकडून मोठी मागणी आहे. सध्या मिनी आकाशकंदील २० रुपयांपासून महा आकाश कंदील जवळपास १००० रुपयांपर्यंत येथे मिळत असतो. हल्ली इको फ्रेंडली वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. रंगीबेरंगी कापडी, हॉलोग्राफी, मार्बल पेपर यासह फोल्डिंगचे असंख्य प्रकारचे आकर्षक आकाश कंदील विक्रीसाठी बाजारात दाखल झाले आहे. त्यात पैराशूट कंदील, आकाशदीप, फायर बॉल, कलश, टोमॅटो बॉल, हॅण्डमेड कापडी तसेच लहान आकाराचे अशा आकाश कंदिलांना चांगली मागणी असून ५० ते ५०० रुपयांपर्यंत भाव आहे. शहरातील अन्य बाजारपेठेतील दुकाने आकाशदिव्यांनी सजली आहेत.

यंदाच्या वर्षी किंमतीत आठ ते दहा टक्क्यांनी वाढगत वर्षीपेक्षा यंदा आकाशदिव्याच्या किंमती ८ ते १० टक्क्यांनी वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले, ग्राहकांनी मेड इन चायना आणि प्लास्टिकच्या आकाशकंदिलांकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे इको फ्रेंडली आकाश कंदील तयार करणाऱ्या विक्रेत्यांकडे दरवर्षी मागणी सातत्याने वाढत आहे. पूर्वीचे कामट्यापासून तयार करण्यात येत असलेले आकाश कंदील आता दिसेनासे झाले आहेत . देशी बनावटीच्या आकाश दिव्याना जास्त पसंती मिळत नसल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.त्यामुळे बाजारपेठा रंगीबेरंगी कंदिलांनी चांगल्याच सजल्या आहेत.

# बिहार निवडणुकीचे बिगूल वाजले

**पाटणा : वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखा अखेर जाहीर झाल्या आहेत. या वेळी, निवडणुका दोन टप्प्यात होणार आहेत. ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणूक आयोगाने बिहार विधानसभा निवडणुकीसह सहा राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातील अशा एकूण आठ जागांसाठी पोटनिवडणुकाही जाहीर केल्या आहेत. एकाच दिवशी या निवडणुका होणार आहेत. बिहार विधानसभेसह १४ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर केले जातील.

भाजपा आणि राजदने मतदान सुलभ करण्यासाठी आणि कार्यक्षम निवडणूक प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी केलेल्या मागण्यांनंतर बिहारमध्ये दोन टप्प्यांची निवडणूक प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. बिहार विधानसभेत एकूण २४३ जागा आहेत आणि सर्व मतदारसंघांमध्ये निवडणुकांसाठी व्यापक तयारी सुरू आहे.

निवडणूक आयोगाने सात राज्यांमधील आठ विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणुकाही जाहीर केल्या आहेत. या पोटनिवडणुका विविध कारणांमुळे रिक्त आहेत.

# अलिबागेत उद्या रोजगार मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग व सरखेल कान्होजी आंग्रे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ऑक्टोबर, २०२५रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत सरखेल कान्होजी आंग्रे औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मु. पो.खंडाळे ता.अलिबाग येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित केला असल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमित पवार यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील नामांकीत आस्थापनांकडील रिक्त पदांच्या/प्रॅटिसशिपची भरतीसाठी रोजगार मेळावा आयोजित केला आहे. सदर मेळाव्यात एस.एस.सी./ एच.एस.सी, आय.टी.आय., डिप्लोमाइंजिनियर, पदवी इंजिनियर, व इतर पदवीधारक नोकरी इच्छूक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. या विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पध्दीतीने अर्ज करता येईल.

प्रथम https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील Employment- Job Seeker (Find - Job)- Job Seeker Login या क्रमाने जाऊन आपल्याकडील युजरआयडी व पासवर्ड वापरून आपली शैक्षणिक माहीती अद्ययावत करून त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ऑप्शनमधून आपला जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नावावरील (पान २ वर..)

# वर्षाअखेर दिसणार तीनदा सुपरमून

### खगोल अभ्यासक सज्ज

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पृथ्वीच्या आकाशात दरवर्षी काही वेळा असा क्षण येतो, जेव्हा पूर्ण चंद्र आपल्या नेहमीच्या आकारापेक्षा थोडा अधिक मोठा आणि तेजस्वी दिसतो. या अद्भुत खगोलशास्त्रीय घटनेला 'सुपरमून' असे म्हटले जाते. या वर्षी म्हणजेच ७ ऑक्टोबर, ५ नोव्हेंबर आणि ४ डिसेंबर अशा तीन दिवशी सुपरमूनचे चित्ताकर्शक आकर्षक दृश्य पाहण्याची संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती खगोल अभ्यासक तथा पोलादपूर येथील एस.एम महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. समीर बुटाला यांनी दिली आहे.

येत्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यांत सुपरमूनचा हा जादुई प्रकाशोत्सव निसर्गाचा अनोखा चमत्कार ठरणार असल्याने खगोलअभ्यासक आकाशात नजर लावून राहाणार आहेत.

# महावितरणच्या ‘गो-ग्रीन’ योजनेला वाढती पसंती

## पर्यावरणस्नेही सात लाख ग्राहकांना आठ कोटींचा फायदा

**नवी मुंबई : बातमीदार**

वीजबिलांच्या छापील कागदांचा वापर बंद करण्यासाठी महावितरणने सुरू केलेल्या ’गो-ग्रीन’ योजनेला वीजग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये तब्बल दोन लाख तीन हजार ३४० वीजग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे. वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ ’इमेल’ व ’एसएमएस’चा पर्याय निवडून सोमवार (दि. ६) पर्यंत लघुदाब वर्गवारीतील पर्यावरणस्नेही ७ लाख ६ हजार ९२४ ग्राहक या योजनेत सहभागी झाले आहे व त्यांना ८ कोटी ४८ लाख ३० हजार ८८० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

‘गो-ग्रीन योजनेतील वीजग्राहकांचा वाढता प्रतिसाद सहभाग स्वागतार्ह आहे. त्यांना वीजबिल डिजिटल स्वरुपात पाठवले जात आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे’, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. विशेष म्हणजे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये २ लाख ३ हजार ३४० ग्राहकांची या योजनेत भर पडली आहे. यात सर्वाधिक पुणे प्रादेशिक विभागातील ८७ हजार ४० ग्राहकांचा तर कोकण प्रादेशिक विभागातील ७८ हजार ८२९ ग्राहकांचा समावेश आहे.या ग्राहकांना आठ कोटी ४८ लाख ३० हजार ८८० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

गो-ग्रीन योजनेसाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर नोंदणी करण्याची स्वतंत्र सोय उपलब्ध आहे. केवळ ग्राहक क्रमांक सबमीट करावे लागेल व छापील बिलाची प्रत रद्द करून संबंधितांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक व इमेलवर दरमहा बिल पाठविण्यात येईल. नोंदणीकृत मोबाईल किंवा इमेल बदलण्याची सोय देखील त्याच ठिकाणी उपलब्ध आहे.

### गो-ग्रीन योजनेचे फायदे

***गो-ग्रीन सहभागी झालेल्या ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत ’इमेल’वर व मोबाईल ’एसएमएस’द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही ऑनलाईन बिल भरणे सोयीचे झाले आहे. इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणक किंवा मोबाइलमध्ये जतन करून ठेवता येते. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.***

# पोलादपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी शताब्दी वर्ष उत्सव

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला या विजयादशमीला १०० वर्षे पूर्ण झाली असून या ऐतिहासिक घटनेच्या निमित्ताने संपूर्ण भारतभर शताब्दी वर्ष मोठया उत्साहात साजरे केले जात आहे. त्याच धर्तीवर पोलादपूर तालुक्याचा विजयादशमी हा शताब्दी वर्ष उद्घाटनाचा उत्सव रविवारी भर पावसात उत्साहात आणि शिस्तबध्द पध्दतीने पार पडला.

या कार्यक्रमात सर्व संघ स्वयंसेवक पारंपारिक गणवेशात उपस्थित होते. महिलावर्गाचीही उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर सूर्यनमस्कार आणि व्यायामयोगाचे सादरीकरण करण्यात आले. सामुहिक समतेचे प्रात्यक्षिक झाले. सांघिक गीतानंतर,अमृतवचन व भावमधुर वैयक्तिक गीतानंतर उपस्थित मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस शंकरराव महाडिक व प्रमुख वक्ते रायगड जिल्हा सेवाप्रमुख रा.स्व संघ रोशन राम पडवळ व पोलादपूर तालुका कार्यवाह समीर चंद्रकांत सकपाळ, हे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रमुख अतिथी शंकरराव महाडिक यांनी संघाची आवश्यकता व संघामुळे समाजजीवनात झालेले बदल उलगडून दाखवले. प्रमुख वक्ते रोशन राम पडवळ यांनी आपल्या भाषणात डॉ. हेडगेवार यांचे विचार, संघाची शंभर वर्षांची वाटचाल आणि देशसेवेतील योगदानावर प्रकाश टाकला. पुढील वर्षीचे नियोजन, ध्येय- उद्दिष्ट उपस्थित स्वयंसेवकांसमोर मांडले. यामध्ये स्वबोध,सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, नागरी कर्तव्य व पर्यावरण या विषयावर पुढील वर्षी समाजाला सोबत घेऊन काम करायचे आहे याचे विस्तृत विवेचन केले.

संपूर्ण कार्यक्रम शिस्त आणि राष्ट्रभक्तीच्या भावनेने भरलेला होता. रविवारी भर पावसात १२० गणवेषधारी स्वयंसेवक व १०७ नागरिकांनी कार्यक्रम यशस्वी केला.---



# माणगावच्या टीएमसी कॉलेजमध्ये शिष्यवृत्ती वाटप



**माणगाव : बातमीदार**

माणगाव येथील जे बी सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज येथे सोमवार दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी शिवाजी मंदिर दादर आणि सरस्वती एज्युकेशन सोसायटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नानासाहेब सावंत यांच्या अथक प्रयत्नाने गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना छावा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष निलेश थोरे यांच्या हस्ते ५१ विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन हजार रुपयांचे धनादेशाचे वाटप करण्यात आले.

या धनादेश वाटपाच्या कार्यक्रमाला कॉलेजच्या प्राचार्य डॉ. अमृता देशमुख,डॉ. जगदीश शिगवण,भारत पवार सर, सायगावकर मॅडम, सीनियर क्लार्क संजय गायकवाड, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कॉलेजच्या प्राचार्य डॉ. अमृता देशमुख यांनी आभार मानले.

# पत्रकारांकडून स्वच्छता रॅली, श्रमदान व कापडी पिशव्यांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सामाजिक संदेश देत स्तुत्य उपक्रमातुंन विविध लोकपयोगी कार्यक्रम राबविणाऱ्या खालापूर तालुका महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या माध्यमातून सणासुदीच्या पार्श्वभूमीवर वासांबे ग्रुप ग्रामपंचायत आणि जनशिक्षण संस्थान (जे.एस.एस) अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय ते शिवाजी चौक ,तसेच मुख्य बाजारपेठमधून मोहोपाडा पोलिस चौकी अशी पत्रकार, शालेय विद्यार्थी, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा प्रवेशद्वारापर्यंत स्वच्छता अभियान रॅली काढण्यात आली.

या वेळी सामजिक संदेश देणारे बॅनर हातात घेत जनजागृती



घोषणा देण्यात आल्या.यावेळी सामूहिक स्वच्छता शपथ ही घेण्यात आली.तसेच पर्यावरण महत्त्व सांगत कापडी पिशव्यांचे वाटप हि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी सरपंच उमा मुंढे, कल्पना म्हात्रे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी,साधनव्यकी वर्षा रामटेके जनशिक्षण संस्थान अलिबाग रायगड अनेक ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे ,तालुका अध्यक्ष अर्जुन कदम, पत्रकार राहुल जाधव, अमोल सांगळे ,गौतम सोनावणे,प्रतीक चाळके, बाळाराम केदारी,शाबीर शेख ,देवा पवार ,फोटोग्राफर पंढरीनाथ कुंरंगळे यांच्यासह खालापूर तालुक्यातील पत्रकार बांधवांनी सहभाग घेत कार्यक्रम दिमाखदार पध्दतीने यशस्वी केला.

# जिल्हा कारागृहातील बंद्यांसाठी व्यसनमुक्तीचे समुपदेशन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कारागृहविभागाच्या सुधारणा व पुनर्वसन या ब्रिदवाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने अलिबाग जिल्हा कारागृह प्रशासनामार्फत बंद्यांसाठी (दि.०४ ऑक्टोबर) रोजी व्यसन मुक्तीचा समुपदेशनपर कार्यक्रम झाला.



कारागृहातील बंद्यांना तंबाखुजन्य तसेच नशायुक्त पदार्थाचे सेवनामुळे त्यांच्या शरीरावर व मनावर होणारे दुष्परिणाम समजून सांगून व्यसनापासून दूर जाण्याकरिता बंद्यांचे मानसिक सबळीकरण करण्याबाबत डॉ.धनेश्वरी गोयर व डॉ.राजेश पवार, मानसोपचार तज्ञ, जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग यांनी बंद्यांना समुपदेशन केले. तसेच श्रीम. तेजस्विनी निराळे, सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग यांनी व्यसनामुळे व्यक्तीच्या शरीरावर, मनावर तसेच कुंटुंब व्यवस्थेवर दुष्परिणाम होत असल्याने व्यसनापासून परावृत्त होण्याकरीता आवाहन करुन व्यसनमुक्तीमुळे बंद्यांचे आरोग्यावर सकारात्मक परिणाम होण्याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाकरीता विशाल बांदल, प्र.अधीक्षक,अलिबाग जिल्हा कारागृह, श्रीम.धनेश्वरी गोयर व राजेश पवार, समोपदेशक जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग तसेच ॲड. मनिषा नागावकर, ॲड. तन्मय म्हात्रे, सहाय्यक लोकअभिरक्षक, श्रीम. नितल म्हात्रे, , किशोर वारगे, श्री.कुटे, सुभेदार व श्री.ठोंबरे व श्री. तारमळे, हवालदार तसेच श्री.नरसु कोळी, का.शिपाई इत्यादी उपस्थित होते.

# खालापूरात विणेगाव येथील हॉटेलवर कुटुंबाला मारहाण

**खोपोली: प्रतिनिधी**

हॉटेलवर जेवण करण्यासाठी गेलेल्या कुटुंबाला परिचयातील तरूणानी लाथाबुक्कयानी मारहाण केल्याची घटना खालापूरातील विणेगाव हद्दीत घडली.

दिपक सुर्यकांत वाघमारे वय ३२,रा.कांढरोली वनखळवाडी, खालापूर हे रविवारी रात्री दहा वाजता विणेगाव येथील न्यु ऋषभ हॉटेल, येथे पत्नी व मुलगा तसेच मित्र रविंद्र हिलम व त्याची पत्नी असे जेवण करण्यासाठी गेले होते. त्यावेळी हॉटेल मध्ये असलेला प्रेम राजेश पवार आणि अतुल ज्ञानेश्वर जाधव यांनी रवींद्रला वेटर संबोधून माझी ऑडर घेवुन ये असा दम दिला.

रवींद्र याने मी वेटर नाही असे बोलला असता मनात राग धरून प्रेम याने त्याचे कानाखाली चापट मारली. तसेच हाताबुक्यांनी मारहाण केली. रवींद्रला होत असलेली मारहाण पाहून दिपक आणि त्याची पत्नी मध्यस्थी करत असताना त्यांना देखील हाताबुक्यांनी मारहाण केली.

त्यानंतर दिपक आई वडील व भावांसह विणेगाव दांडवाडी येथे प्रेम आणि अतुल याना मारहाणी जाब विचारण्यासाठी गेला असताना तेथील गणेश धारपवार,अशोक जाधव, संपत वाघमारे आणि इतर दोघांनी तुम्ही येथे काय भांडण करायला आले आहेत काय ’’ असे बोलुन दिपक वाघमारे त्यांचे भाउ व आई वडीलांना हाताने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून दुखापती केल्या. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे मारहाण करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार मनोहर पाटील करीत आहेत.

# रस्त्यावरील खड्डे बुजवा अन्यथा वृक्षारोपण करू

## सानपाडा भाजपकडून महापालिकेला इशारा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ऑक्टोबरपर्यंत म्हणजेच आठ दिवसाच्या आत सानपाडा विभागातील रस्त्यावरील खड्डे तातडीने न बुजवल्यास त्या ठिकाणी वृक्षारोपण करण्याचा लेखी इशारा भाजयुमोचे माजी नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडूरंग आमले यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलाश शिंदे यांना लेखी निवेदनातून दिला आहे.

सानपाडा परिसरात सेक्टर सातमध्ये सेव्हन्थं डेज हायस्कूल व न्यू अवधूत सोसायटीसमोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे स्थानिक रहिवाशी व वाहनचालकही त्रस्त झाले आहेत. समस्येचे गांभीर्य पाहता संबंधितांना तातडीने या परिसरातील रस्त्यावर पडलेले खड्डे तातडीने बुजविण्याचे निर्देश देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी केली आहे.

या समस्यानिवारणासाठी आपणास यापूर्वीही काही वेळा लेखी निवेदने दिलेली आहेत. आपण ते निवेदन संबंधितांना फॉरवर्डही केले होते. तथापि या कालावधीत काहीही कार्यवाही न झाल्याने खड्डे तसेच आहेत. नवरात्रोत्सव आता संपून गेली असून काही दिवसांनी दिवाळी येईल.

समस्येचे गांभीर्य व स्थानिकांना होत असलेला त्रास पाहता या परिसरातील रस्त्यावरील खड्डे १२ ऑक्टोबरपर्यत न बुजविल्यास सोमवारी, दि. १३ ऑक्टोबर रोजी या ठिकाणी रस्त्यावर ज्या ज्या ठिकाणी खड्डे आहेत, त्या ठिकाणी भाजप कार्यकर्त्यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात येवून अभिनव पद्धतीचे आंदोलन केले जाईल, असा इशारा पांडुरंग आमले यांनी निवेदनातून मनपा प्रशासनाला दिला आहे

# म्हसळा घोणसे घाटांत अवजड ट्रेलरला अपघात

**प्रतिनिधी: म्हसळा**

दिघी-पुणे या राष्ट्रिय मार्गावरील घोणसे घाटांतील तिव्र उतार आणि अवघड वळणावर सोमवारी पहाटे ५.३० वाजता ट्रेलर चा ब्रेक फेल झाल्यामुळे अपघात झाला

सहाय्यक पोलीस उप निरीक्षक राजेंद्र म्हात्रे यानी दिलेल्या माहितीनुसार सदर ट्रेलर मध्ये सुमारे ३५ ते ४० टन अवजड लोखंडी सामान होते ते राजकोट येथून रोहीणी ता. म्हसळा येथे जात आसल्याचे सांगण्यात आले. घोणसे घाटांतील शिघ्र,तीव्र उतार वेडी वाकडी वळणे येथे ब्रेक न लागल्याने हा अपघात झाला. या दोन ते अडीच किलो



मीटरच्या पट्टयांत ५०० ते ७०० मिटरच्या अंतरावर मागील दोन ते तीन वर्षांत १०० ते १५० अपघात झाले आहेत.

## पान १ वरुन

पान १ वरुन

### लोकनेते ‘दिबां’चा वारसा पुढे नेऊया -लोकनेते रामशेठ ठाकूर



या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व खूप मोठे असून आपण भाग्यवान आहोत की त्यांच्या सारखे नेतृत्व आपल्याला लाभले आहे, असे गौरवोद्गार काढले.

### अलिबागेत उद्या रोजगार मेळावा

Vacancy Listingal Agree व दिसणाऱ्या विविध पदाना आपल्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ऑनलाईन अप्लाय करावे. रोजगार मेळाव्यातील रिक्त पदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभा घ्यावा. संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करताना काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०२९ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ४६ रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यात नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात सोमवारी १५५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी डोळ्यात मोतिबिंदू आढळलेल्या ४६ रुग्णांना नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला, शंकरा आय हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. यासाठी प्रवासाची सोय सुद्धा विनामूल्य करण्यात आली होती.

रोहा सिटिझन फोरम आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. श्री धावीर मंदीर भक्त निवासात झालेल्या या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू



शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. शंकरा आय हॉस्पिटलच्या टीम मॅनेजर ज्योती पाटील, डॉ श्रुती मोहन, सिद्धी मोरे, सायली उतेकर यांनी रुग्णांची तपासणी केली. गेल्या तीन वर्षांतील सलग ४२ वे शिबिर पार पडले. रोहा सिटिझन फोरमने आयोजित केलेल्या शिबिरांच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांत ३५०० हून अधिक नेत्र रुग्णांना नवीन दृष्टी प्राप्त झाल्याने शिबिरात तपासणी साठी येणाऱ्या रुग्णांची संख्या कमालीची वाढली आहे.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, मिलिंद अष्टिवकर, श्रीकांत ओक, अहमद दर्जी, महेश सरदार, संदीप सरफळे, इल्यास डबीर, संतोष खटावकर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, बिलाल मोर्बेकर, परशूराम चव्हाण, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, राजेश काफरे, निलेश शिर्के, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, रिद्धी बोथरे, भावेश अग्रवाल आदी फोरमच्या सर्व सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## दुखवटा

### रमाबाई पाटील



**खोपोली:** नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावच्या ज्येष्ठ ग्रामस्थ रमाबाई अण्णा पाटील यांचे दीर्घ आजाराने वयाच्या ८४ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, २ सुपुत्र व तीन विवाहित कन्या, सुना, तसेच नातवंड असा मोठा परिवार आहे.लव्हेज स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मोठ्या प्रमाणात नातेवाईक व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विनायक म्हात्रे

**खालापूर:** विनायक आत्माराम म्हात्रे ,मूळ गाव वाशी वढावं यांचे ३०सप्टेंबर रोजी खालापुरात अल्पशा आजाराने निधन झाले.बापू हे सरकारी फ़ॉरेस्ट खात्यात नोकरीला होते त्यांचे दशक्रिया विधी गुरुवार ९ऑक्टोबर रोजी श्री क्षेत्र उद्धर रामेश्वर पाली येथे होणार आहेत तसेच उत्तर कार्य रविवार दि. १२ऑक्टोबर रोजी खालापूर येथे होणार आहेत त्यांचे पश्चात पत्नी तीन मुलगे, किशोर म्हात्रे, सुधीर म्हात्रे, राजू म्हात्रे,सुना व नातवंड, पुतणे असा मोठा परिवार आहे



# जेएनपीएत कंटेनरमधून बेकायदेशीर आयात केलेला २३ कोटींचा ई-कचरा जप्त

## डीआरआयची धडक कारवाई

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

विदेशातून बेकायदेशीरपणे अल्युमिनियमच्या बनावट नावाखाली चार कंटेनरमधुन आयात करण्यात आलेला २३ कोटी किमतीचा ई-कचऱ्याचा साठा महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) जप्त केला आहे. याप्रकरणी सुत्रधार असलेल्या सुरतमधील एका कंपनीच्या संचालकाला अटक करण्यात आली आहे.



सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणाला हानिकारक ठरणाऱ्या आणि प्रतिबंध असतानाही जेएनपीए बंदरात अल्युमिनियमच्या बनावट नावाखाली चार कंटेनरमधुन हा ई-कचरा आयात करण्यात आलेला होता.

याची माहिती खबऱ्याकडून मिळाल्यानंतर मुंबई महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) संशयित चारही कंटेनर ताब्यात घेऊन तपासणी केली.या तपासणीत ॲल्युमिनियम ट्रीट स्क्रॅप' म्हणून लपवून बनावट पद्धतीने भारतात आयात केला गेलेला ई-कचरा बेकायदेशीरपणे पाठविण्यात आला असल्याची बाब समोर आली. यामध्ये एकूण १७,७६० जुने आणि वापरलेले लॅपटॉप, ११,३४० मिनी/बेअरबोन सीपीयू, ७,१४० प्रोसेसर चिप्स आणि इतर इलेक्ट्रॉनिक घटक जप्त करण्यात आले आहेत.

जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत २३ कोटीच्या घरात असल्याची माहिती डीआरआय विभागाकडून देण्यात आली.याप्रकरणी सुत्रधार असलेल्या सुरतमधील एका कंपनीच्या संचालकाला अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीच तस्करीचे नियोजन, खरेदी आणि वित्तपुरवठा करण्यात सक्रियपणे सहभागी असल्याचे सांगितले. त्याला अटक करण्यात आली असून न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे.

सरकारी धोरणानुसार सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणीय सुरक्षितता धोक्यात येते. अशा प्रतिबंधित वस्तूंची भंगार म्हणून विल्हेवाट लावायच्या आहेत, मात्र अशा बेकायदेशीर मालाची मोठ्या प्रमाणावर तस्करी होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

# सराईत सोनसाखळी इराणी चोर गजाआड

**पनवेल : वार्ताहर**





पनवेलसह नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात मोठ्या प्रमाणात चेन स्नॅचिंगच्या घटना घडत आहेत. या गुन्ह्यांची उकल करण्याच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलिसांनी अत्यंत मुळापर्यंत जाऊन तपास केले. बातमीदार त्याचबरोबर तांत्रिक बाबींचा अवलंब करत सराईत सोनसाखळी चोराला अखेर जेरबंद करण्यात आले.

पनवेल व नवी मुंबई परिसरात गाडीवर येऊन रस्त्यावर चालणाऱ्या पादचाऱ्यांच्या गळ्यामधून सोन्याचे दागिने खेचून घेण्याचे प्रकार घडत आहे. विशेष करून महिलांचे मंगळसूत्र, गंठण, सोन्याची चैन याची स्नॅचिंग होत आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्याच्या अनुषंगाने तसेच संबंधित नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय येनपुरे, गुन्हेगारांना जेरबंद करण्याचे आदेश पोलीस आयुक्त परिमंडळ-उप पोलीस उपायुक्त डॉ. प्रशांत मोहिते आणि सहाय्यक आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी दिले होते. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी पथके तयार केले.

सोनसाखळी चोराला जेरबंद करण्याच्या अनुषंगाने सखोल तपास आणि चौकशी सुरू केली. चैन स्नॅचिंग करण्याची पद्धत अभ्यासली, त्याचबरोबर अभिलेखा वरील गुन्हेगारांची माहिती घेतली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्याचबरोबर गुप्त बातमीदारांचाही आधार घेण्यात आला. त्यानुसार कल्याण आंबिवली येथे इराणी वस्तीमध्ये सराईत सोनसाखळी चोर रहात असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस पथक आंबिवलीला रवाना झाले.

सम्राट डाकी, मिथुन भोसले, चंद्रशेखर चौधरी, नितीन झाले. संदीप भोईर, योगेश भुतकर, राजू लोखंडे, महेश बगाड या खडकपाडा पोलीस ठाण्यातील अंमलदारांच्या मदतीने इराणी वस्तीमध्ये सापळा रचला. सलमान साजिद जाफरी (वय २२ वर्ष रा. आंबिवली) याला फिल्मी स्टाईलने पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने जेरबंद केले.

## लोकशाही दिनानिमित्त तक्रारींचे निवारण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये ६ ऑक्टोबर रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गादर्शनाखाली 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले.

आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा व इतर विभागाचे पाच अर्ज दाखल झाले होते, या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

या वेळी परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त मंगल माळवे, कार्यकारी अधिकारी सुधीर सांळुखे, आरेखक नितीन हुद्दार, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, जन्ममृत्यू विभाग प्रमुख मनोज चव्हाण, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.

# पनवेलमध्ये नऊ महिन्यांत ३१ जुळ्या बाळांचा जन्म

**पनवेल : वार्ताहर**

नजीकच्या काळात जुळी मुले जन्माला येण्याचे प्रमाण वाढले आहे. नऊ महिन्यात ३१ जुळी पनवेलसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात जन्माला आली आहेत. सध्याच्या काळात अनेकांना मातृत्त्वाच्या समस्या उद्भवत असल्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेकांना अपत्य प्राप्ती होत आहे. यामधूनच जुळे जन्माला येण्याचे प्रमाण वाढले आहे.

शासकीय रुग्णालयात सामान्य प्रसुती होण्यासाठी प्रयत्न केले जातात, परंतु बाळाच्या आईची प्रकृती अचानक बिघडली तर तपासणी करून



सिझर करण्याचा निर्णय घेतला जातो. शासकीय रुग्णालयामध्ये सामान्य प्रसुतीचे प्रमाण सध्या वाढलेले दिसून येत आहे.

आयव्हीएफ, आययूआय इतर कृत्रिम गर्भधारणा तंत्रांमुळे जुळ्या-तिळ्या मुलांच्या जन्माचे प्रमाण वाढले आहे. स्त्रिया उशिरा गर्भधारणा करण्याचा निर्णय घेत असल्याने जुळ्या मुलांचे प्रमाण वाढत आहे.

दोन्ही बाळांना एकाच वेळी दूध पाजण्याचा (स्तनपान किंवा बाटलीने) प्रयत्न करा. यामुळे आईचा वेळ वाचतो आणि ती अधिक विश्रांती घेऊ शकते. बाळांची वाढ व्यवस्थित आहे की नाही, हे तपासण्यासाठी त्यांच्या वजनावर नियमित लक्ष ठेवा.

जुळ्या बाळांची काळजी घेताना आईचा थकवा आणि ताण खूप वाढतो. त्यामुळे आईने पुरेशी विश्रांती घेणे अत्यंत आवश्यक आहे.

नजीकच्या काळात पनवेल परिसरात आयव्हीएफ सेंटरचे जाळे पसरले आहे. यामध्ये काही सेंटरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पैसेदेखील उकळले जातात.



**कामोठे : शहरात साम्राज्य द परफेक्ट मेन्स वेअर या पुरुषांच्या वस्त्रदालनाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी भाजप शहराध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक डॉ. अरुण कुमार भगत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, युवा मोर्चाचे अध्यक्ष तेजस जाधव यांची विशेष उपस्थिती होती. आमदार प्रशांत ठाकूर यांनी साम्राज्यच्या टीमचे अभिनंदन केले आणि कामोठ्यामधील युवक उद्योजकांनी अशा उपक्रमांद्वारे व्यवसाय क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करावेत, असे आवाहन त्यांनी केले.**



# 'सीकेटी'च्या 'एनएसएस'तर्फे ग्रामस्वच्छता अभियान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या वतीने संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त ग्राम स्वच्छता अभियानचा शुभारंभ सोमवारी (दि. ६) लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जन्म गावापासून अर्थात न्हावाखाडी येथून सुरू झाला.

सर्व प्रथम म्हसेश्वर मंदिरात विद्यार्थ्यांच्या प्रार्थना व स्वागत गीताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. या वेळी न्हावेखाडी ग्रामपंचायत सरपंच विजेंद्र पाटील, माजी उपसरपंच जितेंद्र म्हात्रे, म्हसेश्वर मंदिर अध्यक्ष सी.एल.ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, नरेश मोकल, प्रकाश कडू, मीनाक्षी पाटील, रंजना पाटील, ललिता ठाकूर, सुनिता भोईर, सदाशिव ठाकूर, सुरेश ठाकूर, वैभव म्हात्रे, राजेश ठाकूर अशोक मोकल, सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, पर्यवेक्षक अजित सोनवणे आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या ३१ विद्यार्थिनी व १६ विद्यार्थी स्वयंसेवकांनी न्हावाखाडी परिसरात तसेच रायगड जिल्हा परिषद मॉन्टेसरी व प्राथमिक शाळेत साफसफाई करण्याचे काम केले. सर्व विद्यार्थ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जन्मघरास भेट दिली तसेच त्यांच्या जन्मघराविषयी व त्यांच्या प्राथमिक शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. दुपार सत्रात लोकनेते रामशेठ ठाकूर व संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजना ग्राम स्वच्छता अभियानाला भेट दिली. या वेळी कार्यक्रम अधिकारी निखिलेश देशमुख यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश कथन केला आणि साहेबांच्या कार्याची थोरवी मांडली.

कार्यक्रमात दिशा बोरसे (बारावी कला) व स्नेहा शिंदे (माजी विद्यार्थिनी) यांनी आजच्या ग्राम स्वच्छता अभियानाचे कार्य व महत्त्व स्पष्ट केले. स्नेहा शिंदे या विद्यार्थिनीने विद्यार्थ्यांना चांगले कार्य करण्याची प्रेरणा दिली. प्राचार्य प्रशांत मोरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन तिचा सन्मान करण्यात आला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुठलेही सामाजिक कार्य करताना संघटन शक्ती व एकीचे बळ किती महत्त्वाचे असते हे उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. प्रत्येक विद्यार्थ्याने या सामाजिक कार्यात सहभागी झाले पाहिजे, निरंतर अभ्यास केला पाहिजे व समाजाला काही ना काही देण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय? विद्यार्थ्यांनी कसे काम केले पाहिजे? आणि रामबागची निर्मिती कशी केली? याचे सोप्या शब्दात विवेचन केले.

या कार्यक्रमात न्हावेखाडी विभागातील जनार्दन ठाकूर, मंजुळा म्हात्रे, जानुबाई ठाकूर, बाबीबाई म्हात्रे, या स्वच्छता दूतांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रम दोन टप्प्यांत झाला असल्याने पूर्वार्धात सहशिक्षिका उजमा कच्छी यांनी तर उत्तरार्धात प्राचार्य प्रशांत मोरे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वीय्य सहाय्यक उमेश पोद्दार यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पुस्तक भेट शुभेच्छा दिल्या. या वेळी पनवेल मंडळ अध्यक्ष सुमीत झुंजारराव, योगेश लहाणे, रूपेश नागवेकर, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे आदी उपस्थित होते.**





**पनवेल : मोरबे येथील भाजप युवा नेता दिनेश फडके यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी कार्यकर्ते रवींद्र पाटील उपस्थित होते.**

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची पनवेलच्या अग्निशमन विभागास भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या इंटेरिअर डिझाईन विभागाच्या वतीने पनवेलमधील अग्निशमक विभागास शनिवारी (दि.४) शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती.



विद्यार्थ्यांना या भेटीत अग्निशमन विभागातील तज्ज्ञ अधिकारी शुभम राठोड आणि शिवा अडे यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले. त्यांनी आग लागल्याच्या वेळी वापरली जाणारी उपकरणे, फायर अलार्म सिस्टम्स, विविध प्रकारची फायर एक्स्टिंग्विशर्स आणि सुरक्षित इमारत डिझाईनमध्ये लागणारी फायर सेफ्टी यंत्रणा याबाबत सविस्तर माहिती दिली. ही माहिती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी तसेच भविष्यातील व्यावसायिक वाटचालीसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल.

या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना फायर फायटिंग सेवा, सुरक्षा प्रणाली तसेच आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यात येणाऱ्या उपाययोजना याविषयी प्रत्यक्ष माहिती मिळवून देणे आणि व्यावहारिक अनुभव प्राप्त करून देणे हा होता.

या शैक्षणिक भेटीत इंटेरिअर डिझाईन विभागाच्या विभागप्रमुख प्रा. ए. आर. प्रज्योती देसाई व प्रा. ए. आर. विनय गावंड यांच्यासह एकूण २२ विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

## संपादकीय

# कफ सिरपबद्दल दक्षता

मध्य प्रदेश व राजस्थानातील मिळून जवळपास १८ मुलांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्यामुळे वादग्रस्त ठरलेल्या 'कोल्ड्रिफ' कफ सिरपवर मध्य प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू व केरळपाठोपाठ महाराष्ट्रातही बंदी घालण्यात आली आहे. मध्य प्रदेशातील आणखी किमान १४ मुले नागपुरातील सरकारी आणि खाजगी रुग्णालयांमध्ये मृत्यूशी झुंज देत आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाला असून नागपुरात दाखल झालेल्या मध्य प्रदेशातील मुलांचा मृत्यू कोल्ड्रिफ कफ सिरपमधील 'डायथिलीन ग्लायकोल' या विषारी रसायनामुळे झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

**महाराष्ट्रात पावसाळा अजुनही संपलेला नाही. त्यामुळे पावसाळ्यातील आजारांचे प्रमाण अजुनही राज्यात लक्षणीय दिसते आहे. विशेषत: लहान मुलांमध्ये या काळात सर्दी, खोकला आणि ताप यांचे प्रमाण मोठे असते. मुलांना खोकला होताच पालक सर्रास त्यांना कफ सिरप देतात. पालकांनी नेहमीच मुलांना डॉक्टरांच्या सल्ल्यानेच कफ सिरप दिले पाहिजे. सध्या मात्र 'घातक रसायना'मुळे बंदी घालण्यात आलेल्या 'कोल्ड्रिफ' या कफ सिरपबद्दल पालकांनी जास्तीची सावधगिरी बाळगण्याची गरज निर्माण झाली आहे. या कफ सिरपमध्ये डायथिलीन ग्लायकोल या घातक रसायनाचे प्रमाण जास्त असल्यामुळे गेल्या महिन्याभरात मध्य प्रदेश आणि राजस्थानात मिळून १२ हून अधिक लहान मुलांचा बळी गेल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे. आता उघडकीस आलेल्या तपशीलांनुसार १ सप्टेंबर रोजी यातील गंभीर अवस्थेतील पहिले मूल नागपूरच्या शासकीय इस्पितळात दाखल झाले होते. त्या मुलापाठोपाठ तशाच स्वरुपाचा खूप ताप व लघवी न होण्याचा त्रास होत असलेली इतरही काही मुले नागपूरमधील सरकारी इस्पितळांतून दाखल झाली. ही सर्व मुले मध्य प्रदेशातील होती. आधी या मुलांना काही इन्फेक्शन असावे असा डॉक्टरांचा समज झाला होता. परंतु मुलांची संख्या वाढताच हे प्रकरण काही वेगळे असल्याचे डॉक्टरांच्या ध्यानात आले. या मुलांच्या किडनी निकामी झाल्या व त्यांचा मेंदूही प्रतिसाद देईनासा झाल्याचे आता डॉक्टरांकडून सांगितले जाते आहे. उपचारांनंतर काही मुलांच्या किडनी पुन्हा काम करू लागल्या. परंतु मेंदू प्रतिसाद देत नसल्याने ही मुले कोमात गेली. काही मुले अगदी अखेरच्या क्षणी गंभीर अवस्थेत रुग्णालयांमध्ये आल्यामुळे त्यांना वाचवणे शक्य झाले नाही. यापैकी सहा मुलांना 'कोल्ड्रिफ' हे कफ सिरप दिले गेल्याचे स्पष्ट झाले. या सिरपमधील 'डायथिलीन ग्लायकॉल'या घातक घटकामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचेही नंतर शवविच्छेदन अहवालांतून उघड झाले. यापूर्वीही कफ सिरपमधील या रसायनामुळे मुले दगावल्याची प्रकरणे भारतात व अन्य देशांत घडली आहेत. गेल्या महिन्याभरात मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील ११ आणि राजस्थानमधील तीन मुलांच्या मृत्यूनंतर कफ सिरपशी असलेला संबंध चर्चेत आला. कफ सिरप प्यायल्यानंतर मुलांची तब्येत वेगाने बिघडल्याचे कुटुंबियांचे म्हणणे आहे. दरम्यान, महाराष्ट्रात या सिरपचे उत्पादन, विक्री आणि वितरणावर बंदी घालण्यात आली असून हे औषध कुठल्याही औषधांच्या दुकानात सापडल्यास टोल फ्री क्रमांकावर फोन करून सांगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यापूर्वीही निरनिराळी कफ सिरप वादग्रस्त ठरली आहेत. मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील मुलांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने दोन वर्षांखालील मुलांना कफ सिरप न देण्याचे निर्देश दिले आहेत. खोकल्याच्या औषधांच्या लेबलचे बारकाईने वाचन करून मुलांसाठीच्या डोसची व त्या औषधाच्या संभाव्य प्रतिक्रियांची माहिती करून घेणे नेहमीच आवश्यक असते.**

# म्हसळा शहर : नवी दिशा, नवी अपेक्षा





म्हसळा शहराची लोकसंख्या २०११ नंतर अवघ्या काही वर्षांत सुमारे १३,८०० पर्यंत पोहोचली असून, ते कोकणातील महत्त्वाच्या शहरी केंद्रांमध्ये नोंदले गेले आहे. हिरवीगार टेकड्या, स्वच्छ हवा व पाण्याच्या साठ्यामुळे शहर निसर्गसमृद्ध आहे. पर्यटन, शेती आणि मत्स्यव्यवसाय या क्षेत्रांत मोठी क्षमता असल्याने शहराचे भवितव्य उज्ज्वल मानले जाते. लोकसंख्या वाढली तरी शहराने आपली नैसर्गिक ओळख कायम ठेवली आहे.

म्हसळा शहर सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात झपाट्याने बदलत आहे. शहराचा व्याप वाढत असून नागरिकांच्या गरजा व अपेक्षा व्यापक झाल्या आहेत. आजचे नागरिक फक्त मूलभूत सुविधांवर अवलबून न थांबता शाश्वत विकास, पारदर्शक कारभार, दर्जेदार सुविधा व सर्वांगीण प्रगतीची मागणी करत आहेत.म्हसळा शहरातील नागरीकांना जसा पाण्याचा प्रश्न जिव्हाळ्याचा वाटतो, तसाच आज माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रातील क्रांतीमुळे, बँकिंग व सर्व शासकीय व्यवहारांमध्ये आलेल्या डिजिटलायझेशनमुळे इंटरनेटचा प्रश्नदेखील महत्त्वाचा वाटू लागला आहे.

मानवी जीवनशैलीत पाणी ही जशी मूलभूत गरज आहे, तशीच १२ महिने २४ तास उपलब्ध होणाऱ्या हायस्पीड नेटवर्कची मागणी देखील आता जोर धरत आहे. ऑनलाईन शिक्षण, ऑनलाईन व्यवसाय, ऑनलाईन बँकिंग सेवा, डिजिटल पेमेंट्स, ई-गव्हर्नन्स यांसारख्या सुविधा इंटरनेटशिवाय अशक्य आहेत. त्यामुळे इंटरनेट हा मुद्दा आजच्या काळात पाण्याइतकाच अनिवार्य ठरू लागला आहे. म्हणूनच नगरपालिकेने पाणीपुरवठ्याबरोबरच, अखंडीत वीजपुरवठा, इंटरनेट व डिजिटल सुविधा याकडे गांभीर्याने लक्ष देणे ही काळाची खरी गरज आहे. कारण आजच्या स्पर्धात्मक जगात ज्या शहरात अखंडीत वीजपुरवठा, मुबलक पाणीपुरवठा आणि इंटरनेट सेवा अखंडित असेल, ते शहरच खऱ्या अर्थाने आधुनिक व प्रगतीच्या दिशेने यशस्वीपणे मार्गक्रमण करते असे मानले जाते.

म्हसळा शहरातील जनता ही नेहमीच नावीन्याचा स्वीकार करणारी जनता म्हणून ओळखली जाते. याच वृत्तीमुळेच दोन चाकी आणि चार चाकी वाहनांच्या बाजारात आलेली जवळपास प्रत्येक नवीन गाडी आज म्हसळ्याच्या रस्त्यांवर डौलाने फिरताना सहज दिसते. परिणामी शहरातील वाहनसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या वाढत्या वाहनसंख्येत महिलांचे योगदानही लक्षणीय आहे. घरगुती आणि व्यावसायिक जबाबदाऱ्यांची सांगड घालताना अनेक महिला आता स्वतःची गाडी वापरू लागल्या आहेत. मुलांना शाळेत सोडणे, मुलांना शाळेतुन आणणे, बाजारहाट करणे, नोकरीच्या ठिकाणी जाणे-येणे अशा दैनंदिन कामांसाठी त्या मोठ्या प्रमाणावर दुचाकी व चारचाकीचा वापर करत आहेत. यामुळे पार्किंग ही समस्या आता केवळ वाहनचालकांची साधी अडचण न राहता, महिलांच्या सुरक्षितता व सोयीशी निगडित गरज बनली आहे. महिलांना निर्धास्तपणे, सुरक्षितपणे व सुलभतेने पार्किंग करता यावे, यासाठी स्वतंत्र व सुयोग्य पार्किंगची व्यवस्था करण्याची मागणी निर्माण होऊ लागली आहे. शहरातील वाहनांची वाढ, महिलांचा सहभाग आणि पार्किंगच्या सुरक्षित व सोयीस्कर सोयी यांचा सखोल अभ्यास करून योग्य उपाययोजना करणं, ही काळाची गरज आहे. म्हसळ्याच्या सर्वांगीण विकासात ही पायरी महत्त्वाची ठरणार आहे.

आज महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर रायगड जिल्ह्याने ठळक स्थान मिळवले आहे. श्रीवर्धन, दिवेआगर, हरीहरेश्वर या समुद्रकिनाऱ्यांवर दिवसेंदिवस पर्यटकांची वाढती वर्दळ हेच त्याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. या पर्यटनस्थळांना भेट देताना म्हसळा ही बाजारपेठ सुकी मच्छी खरेदीसाठी पर्यटकांचे खास आकर्षण ठरते. ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेली म्हसळा बाजारपेठ आजही सुकी मच्छीच्या व्यापारी व्यवहारामुळे प्रसिद्ध आहे. त्यामुळे येथे विक्रेते आणि ग्राहकांची संख्या सातत्याने वाढत असून बाजारपेठेचे व्यापारी महत्त्वही वृद्धिंगत होत आहे.

या बाजारपेठेत येणाऱ्या पर्यटकांमध्ये एक मोठा वर्ग हा शहरी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातून येणारा ग्राहकवर्ग आहे. या वर्गाची अपेक्षा केवळ गुणवत्तापूर्ण वस्तूंपर्यंत मर्यादित नसून, स्वच्छता, सुव्यवस्था आणि आधुनिक सोयीसुविधा या निकषांवरदेखील आहे. सध्या अस्तित्वात असणाऱ्या म्हसळा बाजारपेठेत या अपेक्षांची पूर्तता होत नसल्याने अनेक ग्राहक अनुत्सुक राहतात.यामुळेच भविष्यात म्हसळा शहराच्या आर्थिक प्रगतीसाठी आधुनिक भाजी मंडई व मच्छी मार्केट उभारणे अत्यावश्यक ठरणार आहे. स्वच्छ, सुबक व अत्याधुनिक सोयींनी सज्ज असे बाजारपेठेचे नवे रूप केवळ ग्राहकांना आकर्षित करणार नाही तर व्यापाऱ्यांसाठीही नवे संधीचे दार उघडेल. पर्यटनाच्या वाढत्या प्रवाहाचा फायदा स्थानिक अर्थव्यवस्थेला करून देण्यासाठी अशा बाजारपेठेची उभारणी ही काळाची गरज बनली आहे

म्हसळा शहरातील युवक मतदारांचे प्रमाण वाढले असून, ते रोजगार आणि भविष्यासंदर्भात सजग आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीच्या ठोस योजना आखणे आवश्यक झाले आहे. तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनासाठी वैद्यकीय सेवा, वाहतूक, क्रीडांगण, सार्वजनिक उद्याने, कचरा व्यवस्थापन, बहुउद्देशीय सभागृह आणि सांस्कृतिक उपक्रम यांसारख्या सोयी उपलब्ध करणे गरजेचे आहे.

नियोजनपूर्वक आखलेल्या योजनांमुळे शहराचा समग्र विकास साधता येईल आणि नागरिकांमध्ये विश्वास निर्माण होईल. त्यामुळे नगरपालिका केवळ समस्यांचे निराकरण करणारी नसून, भविष्याभिमुख आणि नागरिकाभिमुख यंत्रणा बनली पाहिजे.

**-प्रा. शिरीष समेळ**, म्हसळा



## बदलते तंत्रज्ञान

### सॅमसंगचा सर्वात स्वस्त स्मार्ट फोन लाँच

कोरियन टेक कंपनी सॅमसंगने भारतीय बाजारात आपला नवीन बजेट स्मार्टफोन, गॅलेक्सी F07 लाँच केला आहे. हा फोन २०३१ पर्यंत सहा वर्षांच्या अँड्रॉइड अपडेटसह येतो. या फोनमध्ये ५०-मेगापिक्सेलचा प्रायमरी कॅमेरा आणि एचडी+ एलसीडी डिस्प्ले आहे.सॅमसंग गॅलेक्सी F07 हा ४ जीबी रॅम आणि ६४ जीबी स्टोरेज असलेल्या एकाच व्हेरिएंटमध्ये लाँच करण्यात आला आहे. त्याची किंमत ७,६९९ रुपये आहे. हा फोन ई-कॉमर्स साइट्सवर ६,९९९ रुपयांना उपलब्ध आहे. डिझाइन : ७.६ मिमी पातळ आणि १८४ ग्रॅम वजनाचेसॅमसंग गॅलेक्सी F07 हा एका चमकदार हिरव्या रंगात येतो, जो एक चमकदार आणि नैसर्गिक लूक देतो. तो १६७.४ मिमी लांब, ७७.४ मिमी रुंद आणि फक्त ७.६ मिमी पातळ आहे. फोनचे वजन १८४ ग्रॅम आहे, ज्यामुळे तो तुमच्या खिशात असो किंवा हातात असो, तो आरामदायी वाटतो.कोपरे गोलाकार आहेत आणि कॅमेरा मॉड्यूल मागील पॅनेलच्या वरच्या बाजूला आहे. बजेट फोनसाठी पुढील बेझल पातळ आहेत. फोनला IP५४ रेटिंग आहे, म्हणजेच तो धूळ आणि पावसापासून सुरक्षित आहे.




डिस्प्ले : सॅमसंगच्या या बजेट फोनमध्ये १६००x७२० पिक्सेल रिझोल्यूशन आणि ९० हर्ट्झच्या पीक ब्राइटनेससह ६.७-इंचाचा एचडी+ एलसीडी डिस्प्ले आहे.हा फोन ऑक्टा-कोर मीडियाटेक हेलिओ G99 प्रोसेसरने सुसज्ज आहे. हा फोन दैनंदिन कामांसाठी, सोशल मीडियासाठी आणि हलक्या गेमिंगसाठी चांगला आहे. यात ४ जीबी रॅम आणि ६४ जीबी अंतर्गत स्टोरेज आहे, जे मायक्रोएसडी कार्डद्वारे २जीबीपर्यंत वाढवता येते. हा फोन अँड्रॉइड १५ वर चालतो, ज्यामध्ये २०३१ पर्यंत जड आणि सुरक्षा अपडेट्स आहेत.

कॅमेरा: मागील बाजूस ड्युअल कॅमेरा सेटअप आहे, ज्यामध्ये ५०MP चा प्रायमरी सेन्सर आणि २ MP चा सेकंडरी कॅमेरा आहे. यात ऑटोफोकस आणि LED फ्लॅश देखील आहे. सेल्फी आणि व्हिडिओग्राफीसाठी, ८ एमपी चा फ्रंट कॅमेरा आहे. फोन ३०fps वर फुल एचडी व्हिडिओ आणि १२०fps स्लो-मोशन व्हिडिओ रेकॉर्ड करू शकतो.

बॅटरी: पॉवर बॅकअपसाठी, फोनमध्ये ५०००mAh बॅटरी आहे, जी जास्त काळ टिकते असा दावा केला जातो.

# मराठी काव्याचे प्रवर्तक केशवसुत



## निमित्त

आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे एक श्रेष्ठ कवी म्हणजे कृष्णाजी केशव दामले. काव्यरत्नावली या मासिकाचे संपादक नारायण नरसिंह फडणीस यांच्या सूचनेवरून त्यांनी 'केशवसूत' या टोपण-नावाचा स्वीकार केला. केशवसुतांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड या गावी ७ ऑक्टोबर १८६६ रोजी झाला. त्यांची आज जयंती...

केशवसुतांचे शिक्षण खेड, बडोदे, वर्धा, नागपूर व पुणे या ठिकाणी झाले. त्यांनी विद्यार्थिदशेतच काव्यलेखनास आरंभ केला असला तरी त्यांचा मुख्य काव्यरचनाकाल १८८५ ते १९०५ हाच होय. या काळातील त्यांच्या सुमारे १३५ कविता आज उपलब्ध आहेत. नागपुरास असताना रेव्ह. टिळक व कवी वसंत यांचा सहवास त्यांना लाभला होता. काव्य हे त्यांचे जीवनध्येय असल्याने स्वाभाविकपणेच त्यांनी काव्यरचनेच्या नव्या वाटा चोखाळल्या. या प्रयत्नात प्रारंभीच्या संस्कृत काव्याचा आदर्श अल्पकालीन ठरला व पूर्वकालीन मराठी काव्य प्रभावशून्य ठरले, परंतु इंग्रजीतील स्वच्छंदतावादी मनोवृत्तीच्या वड्‌र्स्वर्थ, शेली आणि कीट्स यांसारख्या कवींचे काव्य मात्र त्यांना प्रेरक व अनुकरणीय वाटले. इंग्रजी अभ्यासक्रमातून व वि.मो. महाजनींनी विविधज्ञानविस्तारातून प्रकाशित केलेल्या भाषांतरांवरून इंग्रजी स्वच्छंदतावादी काव्य त्यांस काहीसे परिचित झाले होते. त्या काव्याच्या चिंतन मननातून केशवसुतांनी आत्मलेखनात्मक स्फुट भावकविता लिहिली व मराठी कवितेला इंग्रजी काव्यातील आत्माविष्काराचे नवे व क्रांतिकारक वळण दिले. त्यांच्या काव्यात व्यक्तिगत स्नेहसंबंध, कवी व कवित्व, स्त्रीपुरुषांतील प्रेम, निसर्ग, सामाजिक बंडखोरी व गूढ (सक्षात्कारी) अनुभूती अशा विविध विषयांवरील भावानुभवांचा आविष्कार आढळतो.

केशवसुतांनी अशा जबाबदारीने लिहिलेल्या कवितांपैकी, 'स्फूर्ति', 'कवितेचे प्रयोजन', 'आम्ही कोण?' आणि 'प्रतिभा' या महत्त्वाच्या आहेत. 'भृंग', 'पुष्पाप्रत' व 'फुलपांखरूं' या त्यांच्या काही महत्त्वाच्या निसर्गकविता होत. प्रेमविषयक आत्मनिवेदन करणाऱ्या कविताही केशवसुतांनी लिहिल्या. क्रांतिकारक सामाजिक विचार ओजस्वीपणे व्यक्त करणाऱ्या त्यांच्या प्रसिद्ध कविता म्हणजे, 'तुतारी', 'नवा शिपाई' व 'गोफण केली छान' (१९०५) या होत. गूढ अनुभूती व तिची नावीन्यपूर्ण अभिव्यक्ती असलेली 'झपूर्झा' (१८९३) ही त्यांची कविता विशेष गाजली. त्यांच्या अन्य गूढगुंजनात्मक कवितांत 'म्हातारी' (१९०१) व 'हरपले श्रेय' (१९०५) यांचा समावेश होतो.

शिक्षणकालातच १८८०मध्ये त्यांचा विवाह झाला. मॅट्रिकनंतर (१८८९) मुंबईला १८९७पर्यंत निरनिराळ्या हंगामी नोकऱ्या केल्या. पुढे प्लेगमुळे मुंबई सोडून ते खानदेशात गेले. आरंभी भडगावच्या नगरपालिकेच्या शाळेत दुय्यम शिक्षकाची नोकरी केली. १९०१पासून फैजपूरला मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. १९०४मध्ये धारवाडच्या सरकारी शाळेत मराठीचे शिक्षक म्हणून बदली झाली. १९०५ साली हुबळीला गेले असताना ७ नोव्हेंबर रोजी प्लेगने त्यांचे निधन झाले. त्यांच्यामागून आठच दिवसांनी त्यांची पत्नीही मरण पावली. केशवसुतांचा काव्यसंग्रह त्यांच्या मृत्यूनंतर हरि नारायण आपटे यांनी १९मध्ये प्रकाशित केला. **-रा.श्री. जोग**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

### ऑक्टोबर हीटमध्ये अशी घ्या स्वतःची काळजी

पावसाळा जसजसा संपू लागतो, तसे आपण सगळेच हिवाळा सुरू होण्याची वाट पाहू लागतो, पण सध्या आपण सगळेच 'ऑक्टोबर हीट'चा सामना करीत आहोत, ज्याला पावसाळ्यानंतरचे हवामान म्हणतात. विशेषतः उष्ण कटिबंधीय आणि उपोष्ण कटिबंधीय प्रदेशांमध्ये हे हवामान आढळून येते.



याबद्दल डॉ. आविद अमीन सांगतात की, उन्हाळ्यातील उष्णता कोरड्या वातावरणात असते, तर ऑक्टोबर हीटमध्ये पावसाळ्यातून उरलेल्या आर्द्रतेसह उच्च तापमान असते. ऑक्टोबरमध्ये कमी किंवा अगदी न पडलेल्या पावसामुळे वातावरणात आर्द्रता टिकून राहते, ज्यामुळे तापमानातील उष्णता अनुभवायला मिळते, पण ही उष्णता उन्हाळ्यातील तापमानासारखी कोरडी नसते. त्यामुळे विशेषतः उत्तर भारत, महाराष्ट्र, गुजरात यांसारख्या प्रदेशांमध्ये अस्वस्थ करणारे वातावरण निर्माण होते, जे कोरड्या उन्हाळ्याच्या उष्णतेपेक्षा वेगळे ठरते. या कालावधीत वारा नसल्यामुळे अस्वस्थता वाढू शकते, कारण उष्णता, आर्द्रता वातावरणात अडकून राहते. याशिवाय शहरी भागात उष्णतेच्या बेटाच्या घटनेमुळे एक मिश्रित प्रभाव अनुभवला जातो. या ठिकाणी काँक्रीट, डांबरी पृष्ठभाग उष्णता शोषून घेतात आणि ती टिकवून ठेवतात आणि त्यामुळे शहरे या काळात आणखी गरम होतात.

ऑक्टोबर हीटमध्ये सुरक्षित राहण्यासाठी आणि शरीराला हायड्रेशन मिळवून देण्यासाठी दिवसभर भरपूर पाणी प्या. शरीर थंड राहण्यासाठी सौम्य रंगाचे अन् सैलसर कपडे घाला. सकाळी १० ते दुपारी ४दरम्यान खूप ऊन असेल त्या वेळी बाहेर जाणे टाळण्याचा प्रयत्न करा. पंखे, वातानुकूलन यंत्र यांद्वारे तुमच्या घरातील वातावरण थंड ठेवा. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी वारंवार थंड शॉवर, स्पंज बाथ घ्या फळे, भाज्या भरपूर असलेल्या हलक्या जेवणाचे सेवन करा. त्यामुळे शरीरातील उष्णता न वाढता, तुमची ऊर्जा टिकून राहते आदी उपाय सुचवले आहेत. त्याचबरोबर कॅफिन, अल्कोहोल टाळण्याचा प्रयत्न करा, कारण यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. त्याचप्रमाणे या वातावरणात वृद्ध, लहान मुले आदी व्यक्तींची तपासणी करणेदेखील महत्त्वाचे आहे. ते उष्णतेच्या बाबतीत अधिक संवेदनशील असतात. त्यामुळे तुमच्या अन् त्यांच्या शरीराकडे लक्ष द्या. तुम्हाला चक्कर येणे, थकवा येणे किंवा डोकेदुखी जाणवू लागल्यास, उष्णतेशी संबंधित हे आजार टाळण्यासाठी वैद्यकीय मदत घ्या.

# ई-रिक्षाबाबत जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा करणार -मंत्री आदिती तटकरे

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी हातरीक्षा चालकांची अमानवीय प्रथेतून मुक्ती करण्याच्या ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी६ऑगस्टरोजी दिलेला आहे.सर्व हातरीक्षा चालकांचे पुनर्वसन पर्यावरण पूरक अश्या ई-रिक्षा द्वारे करण्याचे आदेश राज्य सरकारला दिलेले आहेत.रायगड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्वसनाची प्रक्रिया६महिन्यात पूर्ण करण्यास सांगितले आहे.ही प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याची विनंती माथेरान ई-रिक्षा जनक आणि याचिकाकर्ते सुनिल शिंदे यांनी महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्या कडे केली आहे.



ई-रिक्षाचे जनक सुनिल शिंदे यांनी महाराष्ट्र राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांची एका कार्यक्रमादरम्यान भेट घेतली.यावेळी त्यांनी माथेरान मधील ई-रिक्षा चालकांची व्यथा त्यांच्याकडे मांडली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माथेरान मध्ये २० ई-रिक्षा प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहेत.मात्र यापैकी १५ ई-रिक्षा शालेय विद्यार्थी आणि उर्वरित ५ ई-रिक्षा स्थानिक आणि पर्यटकांना सेवा पुरवीत आहेत.येथील रस्ते सुस्थितीत नसल्याने ई-रिक्षा नादुरुस्त देखील होत आहेत.ई-रिक्षांची मागणी जास्त आणि संख्या कमी असल्याने प्रवाशांना तासन्तास रांगेत ताटकळत उभे राहावे लागत आहे. माथेरान शहरात एकूण ९४ हात रिक्षा चालक असून अजूनही ७४ हातरीक्षा चालक ई-रिक्षाच्या प्रतीक्षेत आहेत.आता सध्या स्थितीत पर्यटक ई-रिक्षाला पसंती देत असल्याने हातरीक्षा चालकांची उपासमार होत आहे. त्यामुळे उर्वरित ७४ हातरीक्षा चालकांचे पुनर्वसन करण्याचे आदेश दिलेले आहेत.


याबाबत आपण आपल्यास्तरावर प्रयत्न करून या ठिकाणी उर्वरित ई-रिक्षा सुरू करण्यासाठी प्रेयन्त करावे अशी मागणी केली.यावेळी मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितले की जिल्हाधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती घेऊन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यास सांगितले जाईल अशी ग्वाही दिली. त्यामुळे आता लवकरच उर्वरित ई-रिक्षा सुरू होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

# खोपोली पोलीस ठाण्यामध्ये लायन्स क्लब व हेल्प फाउंडेशनतर्फे रक्तदान शिबिर

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ खोपोली, खोपोली पोलीस स्टेशन, महामार्ग वाहतूक पोलीस मदत केंद्र बोरघाट आणि हेल्प फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने समर्पण ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आणि स्वच्छ भारत अभियान खोपोली पोलीस स्टेशनच्या आवारात मोठ्या उत्साहात पार पडले.

या उपक्रमाचे उद्घाटन लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे अध्यक्ष लायन अविनाश राऊत, खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, महामार्ग वाहतूक पोलीस मदत केंद्र बोरघाटचे



पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील आणि हेल्प फाउंडेशनचे अध्यक्ष गुरुनाथ साठेलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या रक्तदान शिबिरात लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे पदाधिकारी, खोपोली पोलीस स्टेशन आणि महामार्ग वाहतूक पोलीस मदत केंद्र बोरघाटचे अधिकारी व कर्मचारी तसेच हेल्प फाउंडेशनचे सदस्य यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. रक्त संकलनाची जबाबदारी समर्पण ब्लड बँक यांनी यशस्वीरित्या सांभाळली.

रक्तदानासोबतच परिसर स्वच्छतेचा संदेश देत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता उपक्रमही राबविण्यात आला. समाजहिताच्या या दुहेरी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे

# करंबेळी आराव ग्रामपंचायतीत मोफत आरोग्य शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत करंबेळी आराव येथे ग्रामपंचायत व जेएसडब्ल्यू संजीवनी मल्टि स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या विद्यमाने तसेच गावातील सामाजिक कार्यकर्ते दिनेश पांडुरंग शेलार यांच्या पुढाकाराने मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन शनिवार ४ ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रशासक प्रसाद म्हात्रे, रघुनाथ भोसले, चंद्रकांत शेलार, मनेष भोसले, राजाराम भोसले,आरोग्य सेवक सुभाष थवई, पोलीस पाटील विजय भोसले, कल्पना भोसले, मुन्नी देशमुख आशावर्कर निरीक्षक कविता भोसले यांच्यासह प्राथमिक व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक व सहशिक्षक, सर्व शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जवजवळ १८० रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला. सदर शिबिराचा मुख्य उद्देश ॲनिमिया मुक्त गाव करण्यासाठी महिलांमध्ये असणारे हिमोग्लोबिनचे प्रमाण तपासणी करण्यात आली.


## बस विकणे आहे

संस्थेची बस आहे त्या स्थितीत विकणे असून इच्छुक व्यक्तींनी संस्थेच्या कार्यालयात संपर्क करावा.

पत्ता :- सहकार द्वारका सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, मोरबे, तालुका पनवेल जिल्हा रायगड. पिन कोड ४१०२०६

**संपर्क क्रमांक : ८२६२८९२२४८**


## मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल तालुका

जावक क्र.:-२६८७/२०२५ दिनांक : ०१/१०/२०२५

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस महात्मा फुले को ऑप. के. सी. लि., पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली. तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहवे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निर्णय दिला जाईल.

| अ.क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | ३२२/२०२५-२६ | **श्री. निसार अकबर पठाण. (कर्जदार)** | बंदर रोड, रुम नं. २३३ अे, पी. डब्ल्यु. डी. ऑफिसच्या शेजारी, ता. पनवेल, जि. रायगड. | १,४३,९००/- |
| | | श्री. समाधान रामदास पाटील (श्री. निसार अकबर पठाण, कर्जदार यांचे जामिनदार) | घर क. १९९, मोठा खांदा, ता. पनवेल, जि.रायगड. | |
| | | श्री. सचिन लक्ष्मण पाटील (श्री. निसार अकबर पठाण, कर्जदार यांचे जामिनदार) | मोठा खांदा, दत्त मंदिरा जवळ, ता. पनवेल, जि.रायगड | |
| २. | ३२३/२०२५-२६ | **श्री. किरण कमलाकर भगत. (कर्जदार)** | घर क.१०८१, जरीमरी मंदिर जवळ, कोळीवाडा, पनवेल, जि. रायगड | २,२७,६८६/- |
| | | श्री. लक्ष्मण गोमा पाटील, (श्री. किरण कमलाकर भगत, कर्जदार यांचे जामिनदार) | मु.पो. तळोजा मजकुर, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. परशुराम ज्ञानदेव लाड (श्री. किरण कमलाकर भगत, कर्जदार यांच जामिनदार) | मु.पो. के.एल. २. १७/२, सेक्टर ६, ई कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ३. | ३२४/२०२५-२६ | **श्री. चंदन हरिश्चंद्र शेलार, (कर्जदार)** | मु. पो. १०७३, कोळेश्वर मंदिराजवळ, कोळीवाडा, ता. पनवेल, जि. रायगड | १,६७,२९१/- |
| | | श्री. मनोज बाळाराम शिंदे. (श्री. चंदन हरिश्चंद्र शेलार, कर्जदार यांचे जामिनदार) | सिमरन रेसीडेन्सी, फ्लॅट नं.१०१, प्लॉट नं.३५. सेक्टर १२. खांदा कॉलनी, पनवेल, | |
| | | श्री. अब्दुल नासीर अब्दुल कादिर अढाळ (श्री. चंदन हरिश्चंद्र शेलार, कर्जदार यांचे जामिनदार) | घर नं. ५८१-३, तळोजा पंचनंद, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ४. | ३२५/२०२५-२६ | **श्री. संतोष मल्लिकार्जुन पाटील. (कर्जदार)** | मु. कोने, पो. अजीवली, मुंबई पुणे हायवे, शाळेसमोर, ता. पनवेल, जि. रायगड | २,८३,६०८/ |
| | | श्री. दानिश जहूर पटेल (श्री. संतोष मल्लिकार्जुन पाटील, कर्जदार यांचे जामिनदार) | मु. कोने, पो. अजीवली, घर नं.१६, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| | | श्री. भूषण धर्मा म्हात्रे (श्री. संतोष मल्लिकार्जुन पाटील, कर्जदार यांचे जामिनदार) | घर नं. १५३, गणेश मंदिरामागे, धाकटा खांदा, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| ५. | ३२६/२०२५-२६ | **सौ. मंगला रामचंद्र चौगुले. (कर्जदार)** | घर नं. ४, मु.पो. भिंगारी, कांदवाडी, ता. पनवेल, जि. रायगड. | १,१५,४८८/ |
| | | सौ. शर्मिला संतोष देशमुख (सौ. मंगला रामचंद्र चौगुले, कर्जदार यांचे जामिनदार) | घर नं. ३७९, वामन परदेशी चाळ, मराठी शाळेजवळ, भिंगारी, ता. पनवेल, जि.रायगड. | |
| | | श्री. अरूण भगवान भिंगारे. (सौ. मंगला रामचंद्र चौगुले, कर्जदार यांचे जामिनदार | मु.पो. अजीवली, जनता विदयालय जवळ ता. पनवेल, जि.रायगड. | |

**सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.**

स्थळ : पनवेल
दिनांक ०१/१०/२०२५

**सही/-**
**श्रीम. भारती काटुळे**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल,**
**जि. रायगड**

# अलिबाग येथे जिल्हास्तरीय कार्यशाळा

**रायगड :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० ते २.३०वाजेपर्यंत जिल्हा नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग येथेअनुसूचित जाती व अनुसूचित जमातीअत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६ या विषयावर एकदिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्याशाळा आयोजित करण्यात आली असून सर्व राजकीय पक्षांनी, नागरिकांनी तसेच या योजनेबाबत कामकाज पाहणारे अधिकारी, कर्मचारी यांनी या एक दिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित रहावे,असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण रायगड-अलिबाग सुनिल जाधव यांनी केले आहे.

## ग्रामपंचायत देवद ता. पनवेल, जि.रायगड

### निविदा सुचना

दि. : ०७/१०/२०२५

ग्रामपंचायत देवद यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत देवद हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत देवद येथे दि.१३/१०/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रामपंचायत देवद यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत देवद परीसरातील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.१३/१०/२०२५ | दि.१३/१०/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री.विनोद वामन वाघमारे**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत देवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पाली बुद्रुक, तहसील-पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार (खाते क्र.४९२) श्री. आनंद महादेव शितकणगे, श्री. सचिन महादेव शितकणगे, श्री. सागर महादेव शितकणगे, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे पाली बुद्रूक, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | खाते क्र. ४९२ एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| १९ | १ | ८-८६-८० | विक्रीदार यांच्या मालकी व ताबेकब्जातील एकुण क्षेत्र १-८६-७० या पैकी विक्री क्षेत्र ०-६९-७० | ५.१७ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विधमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/१०/२०२५

**कार्यालयीन पत्ता**
शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**(खरेदीदाराचे वकिल)**

## ग्रामपंचायत वहाळ ता. पनवेल, जि.रायगड

### निविदा सुचना

दि. : ०७/१०/२०२५

ग्रामपंचायत वहाळ यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत वहाळ हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत वहाळ येथे दि.१३/१०/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रामपंचायत वहाळ यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत वहाळ परीसरातील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.१३/१०/२०२५ | दि.१३/१०/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. रमेश नामदेव तारेकर**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वहाळ**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## ग्रामपंचायत पालीदेवद ता. पनवेल, जि.रायगड

### निविदा सुचना

दि. : ०६/१०/२०२५

ग्रामपंचायत पालीदेवद यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत पालीदेवद हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत पालीदेवद येथे दि.१३/१०/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रामपंचायत पालीदेवद यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत पालीदेवद हद्दीतील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.१३/१०/२०२५ | दि.१३/१०/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. एन.एन. केणी**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेव**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**श्री. दिवेश दत्तात्रेय भगत**
**प्रभारी सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेव**
**( सुकापूर)**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## निवडक



### सात अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त

**नवी मुंबई :** महापालिकेतील सप्टेंबर २०२५ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या सात अधिकारी, कर्मचारी यांच्या मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात सेवानिवृत्ती समारंभ झाला. या वेळी सेवानिवृत्त होणारे कार्यकारी अभियंता वसंत पडघन, सहा.लेखा अधिकारी राजेश कदम, मुख्य औषध निर्माता आशा पाटील, औषध निर्माता प्रकाश तामखडे, आरोग्य सहाय्यक राजेंद्र भोंगाळे, वाहनचालक नंदकुमार भोपी, सफाई कामगार प्रभा परमार अशा सात अधिकारी, कर्मचारी यांना मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. अधिकारी, कर्मचारी यांनी मनोगते व्यक्त करीत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यासोबतचे अनुभव कथन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### सहा उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती



**नवी मुंबई :** मुख्यमंत्री महोदय यांच्या संकल्पनेतील १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत लोकाभिमुख कारभारासोबतच गतीमानतेने निर्णय घेण्याच्या प्रक्रियेकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने १५० दिवसांच्या कार्यक्रमातील एक भाग असलेल्या अनुकंपा तत्वावरील नियुक्त्यांमध्येही नवी मुंबई महानगरपालिकेने आत्यंतिक संवेदनशीलता जपत सहा कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्वावरील नेमणूकपत्र दिले आहे. आज मुंबईमध्ये झालेल्या राज्यस्तरीय रोजगार मेळाव्यामध्ये अनुकंपा व लिपिक भरती नियुक्ती आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रातिनिधीक स्वरूपात प्रदान करण्यात आले.

### नवदुर्गांचा अनोखा सन्मान



**नवी मुंबई :** काही तरी आगळे वेगळे करत १९८५ ते २०२५ पर्यंत दहावी बोर्ड परीक्षा मध्ये ज्या मुली पहिल्या आल्यात,ज्यांचे नाव आज शाळेच्या बोर्ड वर दिमाखात झळकत आहे, त्यांना दररोज, एक सुकन्या,अशा नऊ दिवसात नऊ नवदुर्गा म्हणून सन्मानित करण्यात आल्या. त्यांना शाल, मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन,संस्था अध्यक्ष संदीप नाईक यांच्या संकल्पनेतून सन्मानित करण्यात आले. या साऱ्या नवदुर्गा म्हणजे मौसमी नाईक, सुप्रिया खोत, हेमलता म्हात्रे,सुरेखा बच्छाव, वंदना पाटील, प्रियांका चव्हाण, सुप्रिया म्हात्रे, प्रतीक्षा पाटे आणि अमेया गुंड या विविध क्षेत्रात काम करून विद्यालयाचे नाव मोठे करत आहेत.



**पनवेल : शिवाजीनगर (गव्हाण) येथील विश्वास नारायण ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी विश्वास ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

# नवी मुंबईत विशाखा समितीतर्फे जागरूकता

## महिला सुरक्षा आणि कार्यस्थळी लैंगिक छळविरोधी उपाययोजनांची माहिती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका परिमंडळ १ अंतर्गत कार्यरत असणाऱ्या नवी मुंबई महापालिकेतील महिला व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी विशाखा समितीच्या वतीने जागरूकता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महिला सुरक्षा आणि कार्यस्थळी लैंगिक छळविरोधी उपाययोजनांची माहिती देण्याच्या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा उद्देश सफल झाला.



शारदीय नवरात्रौत्सव आणि सशक्त नारी स्वस्थ कुटुंब या उपक्रमसोबत विशाखा समितीचे हे प्रबोधनपर शिबिर आयोजित करण्यात आले. या वेळी क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपआयुक्त तथा नमुंमपा विशाखा समितीच्या अध्यक्ष अभिलाषा पाटील, समाजविभाग विभागाच्या उपायुक्त नयना ससाणे, आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या उपायुक्त ललिता बाबर, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नाप्रभा चव्हाण, कार्यकारी अभियंता शुभांगी दोडे तसेच अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड व इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त करतांना नमुंमपा विशाखा समितीच्या अध्यक्ष तथा उपायुक्त अभिलाषा पाटील यांनी मागील वर्ष भरात विशाखा समितीमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. नवी मुंबई महापालिकेतील कार्यालयीन वातावरण हे अत्यंत खेळीमेळीचे व चांगले असून आपल्याकडे विशेष तक्रारी येत नाहीत. तथापि सर्व महिला कर्मचाऱ्यांना विशाखा समिती विषयी माहिती असावी, लैंगिक छळामध्ये नेमका कशाचा समावेश होते या विषयी माहिती असावी या दृष्टीने हे शिबीर आयोजित करण्यात आले असल्याचे त्या म्हणाल्या. या वेळी त्यांनी नमुंमपा मुख्य विशाखा समिती व त्या अंतर्गत येणाऱ्या आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व परिवहन विभाग अशा तिन्ही विभागातील विशाखा समिती विषयी सविस्तर माहिती दिली.

डॉ. रत्नप्रभा चव्हाण यांनी महिला या घरातील मंत्री आहेत असे म्हणत त्या आरोग्य विभागातील विशाखा समितीच्या अध्यक्ष असतानाचे अनुभव सांगितले. महापालिका सचिव चित्रा बाविस्कर यांनी कार्यालयात वावरताना महिला / पुरुष असा भेद न करता प्रत्येकाला कर्मचारी म्हणून समान गृहीत धरले पाहिजे, तसेच महिला म्हणून विशेष सवलती घेऊ नयेत, असे मत मांडले. उपायुक्त नयना ससाणे यांनी या वेळी बोलताना विशाखा समितीची कार्यपद्धती, गोपनीयता याबाबत स्वतःचे अनुभव सांगितले. उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड यांनी विशाखा समितीने काम करताना दक्षतेने काम करावे, कोणत्याही निरपराध कर्मचाऱ्यावर अन्याय होऊ नये याची खबरदारी घ्यावी असे सांगितले.

नमुंमपा स्थरावरील मुख्य विशाखा समितीचे सर्व सदस्य, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, परिवहन विभाग येथीलही विशाखा समितीचे सदस्य उपस्थित होते.

### सविस्तर मार्गदर्शन

ॲड. हेमांगी पाटील यांनी लैंगिक छळ म्हणजे काय, विशाखा समिती कसे काम करते या समितीकडे कोण दाद मागू शकते या विषयी लहान व्हिडिओ दाखवत अतिशय रंजकतेने सर्व माहितीचे सादरीकरण केले. विशाखा समितीकडे तक्रार करायची झाल्यास ती कशा प्रकारे करावी, त्यामध्ये कोणती माहिती अंतर्भूत करावी या विषयी स्वप्नीला यादव यांनी माहिती दिली.

## कडापे प्राथमिक शाळेत कृतज्ञता सोहळा



**उरण : रामप्रहर वृत्त**

कडापे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या प्राथमिक शाळेत दहा वर्ष अध्यापनाचे काम करणाऱ्या मुख्याध्यापक हितेंद्र म्हात्रे व सहाय्यक शिक्षक रमेश पाटील या सत्कारमूर्तींना शालेय व्यवस्थापन कमिटी व ग्रामस्थ मंडळ कडापे यांच्या वतीने गौरवण्यात आले. कमिटीचे माजी अध्यक्ष जितेंद्र थळी स्नेहा थळी सरिता मॅडम व नागेंद्र म्हात्रे यांनी आपले विचार मांडले. सत्कारमूर्ती हितेंद्र म्हात्रे व रमेश पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमासाठी गणेश थळी यांनी आर्थिक स्वरूपाची मदत केली होती. या वेळी सारडे विकास मंचातर्फे विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. प्रास्ताविक प्रशांत म्हात्रे यांनी तर सूत्रसंचालन निवास गावंड यांनी केले.

## बायोमेट्रिक हजेरी प्रणाली प्रभावीपणे राबविण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको, नवी मुंबई महानगरपालिका तसेच कोकण विभागीय आयुक्तालय या महत्त्वपूर्ण शासकीय कार्यालयांमध्ये अजूनही बायोमेट्रिक हजेरी प्रणाली प्रभावीपणे कार्यरत नसल्याचे उघड झाले असून, या पार्श्वभूमीवर सजग नागरिक मंच नवी मुंबईने कायदेशीर निवेदन सादर केले आहे. या निवेदनाची प्रत मंचाने आयुक्तांसह मुख्यमंत्री, मुख्य सचिवांना पाठवली आहे.

३ ऑक्टोबर २०२५ रोजी सादर करण्यात आलेल्या या निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, शासन निर्णय २१ मार्च २०१८ नुसार सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य असून त्याचे उल्लंघन करणे हा प्रशासकीय शिस्तभंग आहे, परंतु प्रत्यक्ष पाहणीत सिडकोसह अनेक कार्यालयांमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचारी कार्यालयाच्या विहित वेळेत उपस्थित राहत नसल्याचे समोर आलेले आहे. मुंबई महापालिकेत फेस रिकग्निशन आयडेंटिफिकेशन प्रणाली यशस्वीपणे कार्यान्वित झाल्याचे उदाहरण देत, हीच प्रणाली नवी मुंबईतही तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी मंचाने केली आहे.

**मंचाच्या प्रमुख मागण्या**

फेस रिकग्निशन आधारित बायोमेट्रिक प्रणाली सर्व कार्यालयांत तातडीने सुरू करावी. सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीशी थेट जोडावे. कनिष्ठ तसेच वरिष्ठ अशा सर्व पातळ्यांवर हजेरी सक्तीची करावी. शासकीय कार्यालयांत फोटो/व्हिडिओ चित्रीकरणाबाबत स्पष्ट नियमावली दर्शनी भागात लावावी. सर्व कर्मचारी–अधिकाऱ्यांना ओळखपत्र परिधान करणे बंधनकारक करावे. मंचाने आपल्या निवेदनात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. फेस रिकग्निशन प्रणाली कार्यान्वित झाल्यास केवळ हजेरी व्यवस्थापनच नव्हे, तर सुरक्षेच्या दृष्टीनेही मोठा फायदा होईल. कार्यालयात वारंवार येणाऱ्या एजेंटराज वर अंकुश ठेवण्यासाठीही या प्रणालीचा उपयोग होऊ शकतो, असे मंचाचे म्हणणे आहे.

> **ज्या प्रशासनाकडून राज्य शासनाने निश्चित केलेल्या नियम कायद्याची अंमलबजावणी करणे अभिप्रेत आहे, जी प्रशासकीय मंडळी नागरिकांना नियम–कायद्याचे पालन न करण्याबाबत दंड लावते त्याच प्रशासनातील कर्मचारी–अधिकाऱ्यांनी स्वतःसाठी राज्य शासनाने निहित केलेल्या नियमांचे उल्लंघन करणे कायद्यासमोर सर्व समान या लोकशाहीतील मूलभूत तत्वाची पायमल्ली ठरते.**
>
> **–विशाल माने,** प्रशासकीय सल्लागार, सजग नागरिक मंच नवी मुंबई

## उरण ते शिर्डी पदयात्रेला सुरुवात

**उरण : बातमीदार**

ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळ उरण हे मंडळ एक आदर्श मंडळ असून गेली २४ वर्षे अखंडपणे नित्यनेमाने श्री साई मंदिर अंबिकावाडी उरण ते शिर्डी अशी पदयात्रा मंडळातर्फे काढली जात आहे.



यंदाचे पदयात्राचे रौप्य महोत्सवी असे पंचविसावे वर्ष आहे. या मंडळातर्फे रविवार ०५/१०/२०२५ ते सोमवार १३/१०/२०२५ या कालावधीत उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मंडळाचे पदाधिकारी सदस्य, साईभक्त उरण मधून शिर्डी कडे जाण्यासाठी रवाना झाले आहेत. साईबाबाचे नामस्मरण करत भक्तीगीत गात हे पदयात्री १३/१०/२०२५ रोजी शिर्डीत पोहोचणार आहेत. गुरुवार१६/१०/२०२५ रोजी सायंकाळी ५ ते १० या वेळेत श्री साई मंदिर, अंबिकावाडी नागाव उरण येथे श्री साई भंडाराचे आयोजन करण्यात आले आहे.

पहाटे ४ वाजता श्रीच्या चरण पादुका, पालखी पूजन, काकड आरती, पुढील प्रस्थान, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती व श्री साई चरित्र अध्याय पारायण, दुपारी ३ वाजता ॐ श्री साईनाथाय नमः मंत्राचा जप व पुढील प्रस्थान, सायंकाळी ६:३० वाजता धूप आरती, ६:३० ते ८ भजन कीर्तन भारूड प्रवचन असा पदयात्रेतील दैनंदिन कार्यक्रम आहे.

पदयात्रा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष संदीप ठाकूर, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत पाटील, सचिव विजय घरत, उपसचिव गणेश पाटील, खजिनदार हिम्मत पाटील, दत्तात्रेय भोईर, भजन प्रमुख कपिल म्हात्रे, पालखी प्रमुख उमेश भोईर, दीपक म्हात्रे खानपान चाया म्हात्रे, मधुकर पाटील, नागूबाई घरत, शांताताई संजय भोईर, महिला हरिपाठ मंडळ प्रमिला घरत, नयना नाईक, निराबाई घरत, सल्लागार जनार्दन घरत, बळीराम गायकवाड, हरिभाऊ नाईक तसेच सर्व पदयात्री, कारसेवक साई भक्त विशेष मेहनत घेत आहेत.

## वाशीत आरएसएसचे शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या शताब्दी वर्षाची सुरुवात वाशी नगरात भव्य विजयादशमी उत्सवाने केली. या प्रसंगी डॉ. शाम पिंगळे मुख्य अतिथी व जयश्री शिंदे अणि महेश शिंदे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते. या वेळी २२० स्वयंसेवक आणि ३६० सज्जनशक्तींची उपस्थिती होती.

हिंदू समाजात विजयादशमीचे शाश्वत महत्त्व राहिले आहे, कारण ही शक्ती व पराक्रमाच्या जागृतीचे प्रतीक मानली जाते. विजयादशमी उत्सव हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परंपरेचा अविभाज्य भाग राहिला असून, अनुशासन, एकता आणि सांस्कृतिक गौरव याचे प्रतीक आहे. यंदा शताब्दी वर्षाच्या प्रारंभासोबत हा उत्सव स्वयंसेवक व संपूर्ण हिंदू समाजासाठी विशेष महत्त्वाचा ठरला.

प्रत्येक विजयादशमी उत्सवाप्रमाणे यंदाही शस्त्रपूजन, मुख्य उद्बोधन तसेच विशिष्ट अतिथींची भाषणे अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वयंसेवक पूर्ण गणवेशात उपस्थित होते तसेच समाजातील सज्जनशक्तीने या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

उत्सवाची माहिती देताना नगर कार्यवाह म्हणाले: वाशी नगर, नवी मुंबई भागात येते. उत्सवाच्या निमंत्रणात व आयोजनात आम्हाला सज्जनशक्तीकडून प्रचंड उत्साह व सकारात्मक प्रतिसाद मिळाला. हा उत्साह फक्त विजयादशमी उत्सवापुरता मर्यादित राहिला नाही, तर संघ शताब्दी वर्षाबाबतदेखील व्यापक स्वरूपात दिसून आला.



## कळंबोली सर्कल येथे उड्डाणपुल, भुयारी मार्गाचे काम जलदगतीने

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडून कळंबोली जंक्शनची सुधारणा करण्यात येत आहे. कळंबोली सर्कल येथे नव्याने उड्डाणपुल व भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. सध्या हे काम जलदगतीने सुरू असून मागील एका महिन्यामध्ये दहा टक्के काम पूर्ण झाले आहे.



आत्तापर्यंत २५० पाईल्स पूर्ण केले आहेत, तर १८ पाईल्स फाउंडेशन आणि ८ पाईल्स फ्लायओव्हरचे कास्टिंग यार्ड सुरू झाले आहे आणि १४ पाईल्स सध्या टाकण्यात आले आहेत. दरम्यान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होणार असून यापूर्वी रस्ते जोडणीचे काम आता जलदगतीने सुरू झाले आहे. कळंबोली जंक्शनवर होत असणाऱ्या वाहतूक कोंडीमधून वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. या कामामुळे कळंबोली सर्कल येथे वाहतूककोंडी होऊ नये, यासाठी यशवंतराव चव्हाण मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील मुंबई वाहिनीवरील पनवेल एक्झीट हा पढील सहा महिन्यांनी सुरू होणार आहे. सध्या युद्ध पातळीवर काम सुरू असून खोदकाम करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

कळंबोली जंक्शनचे काम पूर्ण झाल्यानंतर मुंबई पुणे एक्सप्रेसवे वरून जेएनपीटी, कल्याण शीळफाटा व सायन पनवेल मार्गावर जाण्यासाठी फ्लायओव्हरचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे कळंबोली सर्कल येथे पनवेलकडे व मुंबईकडे जाणारी वाहतूक कोंडी आता सुटणार आहे. तर सर्व यंत्रणा जलदगतीने कामाला लावली असल्याचे महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे आता लवकरच नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## विषारी नाग आणि अजगरास जीवदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेरूळ, एमआयडीसी, महात्मा गांधी नगर, ब्लॉक कंपनी मध्ये काम करत असलेल्या कामगारांचा पुनर्वसु फॉउंडेशनला कॉल आला, त्यांनी फोन वरून माहिती दिली की कंपनी परिसरात एक भला मोठा साप फिरत आहे.

पुनर्वसु फॉउंडेशनचे सर्पमित्र शुभम सदानंद भोस्तेकर, गौवर मोहिते व त्यांचे सहकारी मित्र अमृत धनवडे, चेतन मालुसरे, त्वरित घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोचल्यावर तिथ कचऱ्याचा खूप साऱ्या गोण्या पडलेल्या दिसल्या. जागा अतिशय कमी वा अडगाळीची होती. सर्वांनी मिळवून अडगळ, कचरा, गोण्या हटवण्यास सुरवात केली, लोकांनी सापाचे व्हिडीओ दाखवले. त्यावरून तो अजगर जातीचा सर्प असल्याचे लक्षात आले, पण अजगरास शोधता शोधता अचानक एका गोणी हलवताक्षणी त्यातून एक भारतीय अत्यंत विषारी नाग जातीचा सर्प फणा काढून समोर उभा राहिला. गौरव व शुभम यांनी अत्यंत सुरक्षितरित्या पब्लिक व सहकारी मित्रांना मागे सारून नागाला सुरक्षितरित्या पकडले.



त्या नंतर पुन्हा अजगराचा शोध सुरु केला खूप साऱ्या गोण्या काढून झाल्यावर एका लाकडी भूष्याच्या गोणीखाली अजगराच्या शरीराचा काही भाग दिसला. टीमने त्वरित सर्व भुस्सा, कचरा हटवून अजगरालादेखील सुरक्षित रित्या पकडला. एवढ्या अडचणीत, कमी जागेत दोन – दोन सापांना सुरक्षित रित्या पकडल्याबद्दल नागरिकांनी पुनर्वसू टीमचे कौतुक करत आभार मानले. त्या नंतर दोन्ही सापांना जंगलात सुरक्षितरित्या सोडून देण्यात आले.

# रायगडमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम

## 'समाजात आमुलाग्र बदल घडविण्यासाठी सज्जन शक्तींनी पुढे यावे'



**मुरूड :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आज जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करताना दिसतो आहे .हे सर्व काम हिंदू समाजाचे संघटन करण्यासाठी आहे . त्यामुळे मुळ देश साध्य करण्यासाठी मनुष्य निर्माण करण्यावर संघाचा प्रयत्न आहे. पंच परिवर्तन सुत्रांच्या आधारे समाजात आमुलाग्र बदल घडविण्यासाठी सज्जन शक्तींनी पुढे यावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रायगड विभाग कार्यवाह विजय सावंत यांनी केले.

मुरुड तालुका रा . स्व .संघ शताब्दी वर्षा निमित्य आयोजित एका जाहीर कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सावंत बोलत होते. आपल्या भाषणात त्यांनी समरसता गतविधी, कुटुम्ब प्रबोधन, स्व जागरण , नागरी कर्तव्य आणि पर्यावरण संवर्धन या पंचसुत्री वर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन करून समाजात अकारण पसरविल्या जाणाऱ्या विमर्श (नॅरेटिव्ह) कडे सावधपणे लक्ष देऊन कृती केली पाहिजे, असे आवाहन केले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी डॉ. विश्वास चव्हाण, विभाग कार्यवाह विजय सावंत, मुरूड तालुका संघचालक संजय ठाकूर हे उपस्थित होत.

मान्यवरांचे हस्ते शस्त्र पूजन करण्यात आले.

प्रमुख अतिथी डॉ. विश्वास चव्हाण यांनी संघाची भूमिका ही राष्ट्र हिताच्या बाबतीत आग्रही असल्याचे सांगुन ज्या ज्या वेळी देशावर संकट येईल त्या त्या वेळेस संकट मोचक म्हणून संघ ठाम पणे उभा राहून मदतीचा हात पुढे केला आहे. शंभर वर्षात अनेक सामाजिक चळवळी , संघटना उभ्या राहिल्या परंतु काळाच्या कसोटीवर संघ च टिकून राहिल्याचे गौरवपूर्वक सांगितले .१०० पूर्ण गणवेश धारी स्वयंसेवक व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

या वेळी यष्टी , दंड , योगासने व व्यायाम योगाचे प्रात्यक्षिके ही सादर करण्यात आली. प्रास्ताविक – तालुका कार्यवाह अक्षय भाटकर यांनी केले . तर मुख्य शिक्षक म्हणून समीर उपाध्ये तर कुमार आर्कशी यांनी सामुहिक पद्द गायिले .सरसंघचालक डॉ . हेडगेवार , पूजनीय श्री . गोळवलकर गुरुजी यांची सुंदर रांगोळीपंकज निरकर याने रेखाटली होती . सूत्रसंचालन मेघराज जाधव यांनी केले .

## रोहा येथे श्री विजयादशमी उत्सव साजरा

**धाटाव :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त रोहा तालुका संघटनेतर्फे श्री विजयादशमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नदी संवर्धन मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला स्वयंसेवकांसह शेकडो नागरिकांनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अशोक अप्पासाहेब जाधव, प्रमुख वक्ते म्हणून सुनिलजी पाटील, रायगड विभाग सहकार्यवाह यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्री पाटील यांनी आपल्या भाषणात संघाच्या शतकपूर्ती कार्याचा मागोवा घेत हिंदू समाजातील एकता, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी नव्या पिढीला संघाच्या कार्यात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण, संघगीत आणि घोष वादन यांसारख्या परंपरागत रीतिरिवाजांनी झाली. नंतर विविध शाखांमधील स्वयंसेवकांनी संघशिस्त, व्यायाम आणि योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. मंदार रामचंद्र परांजपे, रोहा तालुका संघचालक, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करत संघाच्या १०० वर्षांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा दिला आणि पुढील काळात संघाच्या कार्यामध्ये जनतेच्या अधिकाधिक सहभागाची अपेक्षा व्यक्त केली. आजची युवा पिढीला संघाच्या माध्यमातून घडवण्याची जबाबदारी आहे. देशाचे फाळणी झाल्यापासून ते आज तागायत नेहमीच संघाचेकार्य देशाच्या उन्नतीसाठी राहिले आहे वर्षानुवर्षी ज्या कडक शिकवणीमध्ये संघाचे उपक्रम होतात.

## पेण तालुक्यात संघाचा विजयादशमी उत्सव



**पेण :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, रायगड विभाग पेण तालुका यांच्या वतीने श्री विजयादशमी उत्सव रविवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी चिंचपाडा येथील आगरी समाज हॉल येथे मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी खासदार धैर्यशिल पाटील व आमदार रविशेठ पाटील यांची उपस्थिती लाभली

हिंदू समाजातील शौर्य, शक्ती आणि एकात्मतेचे प्रतीक असणारा श्री विजयादशमी हा दिवस संघाच्या कार्याची प्रेरणा देणारा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला यंदा १०० वर्षे पूर्ण होत असल्याने या वर्षीचा उत्सव अधिकच भव्यतेने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून उद्योगपती राजू पिचिका उपस्थित होते, तर प्रमुख वक्ते म्हणून रघुजीराजे आंग्रे,माजी संघचालक, रायगड विभाग यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रभावी भाषणातून संघ कार्याची भूमिका, समाजनिर्मितीतील स्वयंसेवकांची जबाबदारी आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदान यावर सखोल प्रकाश टाकण्यात आला.

या प्रसंगी राज्यसभा खासदार धैर्यशीलदादा पाटील यांच्यासह आमदार रविशेठ पाटील व पेण लायन्स क्लबचे अध्यक्ष श्री. डी. पी. धोत्रे सर यांच्यासह विविध सामाजिक संस्था व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व संयोजनतालुका कार्यवाह आदित्य कोकिळ यांनी केले. उत्सवात स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध संचलन, प्रार्थना आणि देशभक्तीपर गीतांद्वारे उपस्थितांचे मन जिंकले. अखेरीस सर्व उपस्थितांनी एकात्मतेचा संकल्प केला

## माणगावात विजयादशमी उत्सव उत्साहात

**माणगाव :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर माणगाव तालुका विजयादशमी उत्सव रविवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी सरलादेवी मंगल कार्यालय माणगाव येथे सायंकाळी उत्साहात संपन्न झाला.

दीपप्रज्वलन व शस्त्र पूजन करून या उत्सवाची सुरुवात प्रमुख अतिथी डॉक्टर नंदकुमार राजपूरकर, प्रमुख वक्ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रांत शारीरिक प्रमुख अनंत सप्रे , तालुका कार्यवाह अजित शेडगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व शस्त्र पूजन करून करण्यात आले. यानिमित्ताने स्वयंसेवकांनी व्यायाम योग, सूर्यनमस्कार व समतेचे, सांघिक गीताचे प्रात्यक्षिक सादर केले.

स्वयंसेवकांनी 'पंचपरिवर्तन' कार्यासाठी अधिक योगदान द्यावे, सामाजिक समरसता, पर्यावरण संवर्धन, कुटुंब प्रबोधन, नागरी बोध आणि स्वबोध या पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून संघ समाजात सकारात्मक बदल घडवू पाहत आहे.संघ हे समाजाचे संघटन असून राष्ट्राला परम वैभवी नेण्याचे स्वप्न सर्व स्वयंसेवकांचे असल्याचे मत प्रमुख वक्ते अनंत सप्रे यांनी व्यक्त केले. प्रमुख अतिथी नंदकुमार राजपूत यांनीही विजयादशमी उत्सवाच्या निमित्ताने सर्व स्वयंसेवक व उपस्थित समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

कार्यवाह अजित शेडगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण जोशी यांनी केले.

## 'आपल्याला मोबाईलला पार्किंग करता आले पाहिजे



**कर्जत :** 'आपल्याला मोबाईलला पार्किंग करता आलं पाहिजे. अर्ध्या तासासाठी पार्किंग करा एक तासासाठी पार्किंग करा मोबाईल साईडला ठेवा. मोबाईल शत्रू नाहीये परंतु कुटुंबाचे प्रबोधन होण्याची आवश्यकता आहे आणि याच्या सगळ्यात महत्त्वाची भूमिका माझ्या आया बहिणींना विनंती करतो तुमची भूमिका महत्वाची आहे. कुटुंबाचे प्रबोधन तुमच्याशिवाय होणं शक्य नाही पुरुष मंडळींना मर्यादा आहेत ते कुटुंब प्रबोधन करू शकत नाहीत त्यांचं प्रबोधन तुम्ही करू शकता म्हणून ज्या कुटुंबामध्ये प्रबोधन होतं तिथली भाषा व भूषा स्वदेशी सगळ्या गोष्टी कुटुंबात येतात.' असे परखड मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे कोकण प्रांत कार्यवाह विठ्ठल कांबळे यांनी व्यक्त केले.

कर्जत शहरातील रॉयल गार्डन सभागृहात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने काल रविवारी संध्याकाळी विजया दशमी उत्सव व शस्त्र पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. शस्त्रपूजन विठ्ठल कांबळे आणि प्रमुख पाहुणे श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे संस्थापक भरत वाटवाणी यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वज लावून संघाच्या नमस्ते सदा वत्सले मातृभूमे..या प्रार्थनेने सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. तालुका कार्यवाह श्रीहरी काळे यांनी प्रस्ताविक केले.

कांबळे पुढे म्हणाले, 'सणा पेक्षाही आज आपण उत्सव करीत आहोत उत्सव ही भावना आपल्या सोयीनुसार आपल्याला जमेल तेव्हा एकत्र येऊन आपण उत्सव कधीही करू शकतो कारण भारत हा देश उत्सव प्रिय देश आहे. विजयादशमीच्या दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि शंभर वर्ष असं आता मला माहित नाही असे कुणीही नाही. त्यामुळे एखाद्या कामाला शंभर वर्ष पूर्ण झाली म्हटल्यानंतर एक जल्लोष एक उत्सव उत्साह अशा प्रकारे होत असतो राष्ट्रीय संघाचे काम अशा प्रकारे मिरवून घेणे आणि स्वतःच कौतुक करणे हे संघाच्या कार्यपद्धतीत बसत नाही.'भरत वाटवाणी यांनी, ' माझे गुरु बाबा आमटे यांच्याकडून मला श्रद्धा पुनर्वसन केंद्र सुरु करण्याची प्रेरणा मिळाली. आत्ता पर्यंत सुमारे बारा हजार लोकांना आपआपल्याला कुटुंबियांपर्यंत पोहोचविण्यात आले आहे. आई मुलाची भेट, पती पत्नीची भेट झाली की आम्हाला वेगळेच समाधान मिळते.' असे स्पष्ट केले. सूत्रसंचालन सागर वाघेला तर आभार प्रदर्शन मिलिंद खंडागळे यांनी केले.

## हिंदू जनजागृती समिती पनवेल आणि खोपोली येथे शौर्य प्रशिक्षण शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

समाजात दररोज घडणाऱ्या घटना पाहता आपल्याला जीवन असुरक्षित झाल्याचे दिसून येत आहे यासाठी स्वसंरक्षणाच्या कला शिकणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर उपासनेचे बळ वाढवून देवाची कृपा संपादन करणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आई भवानीच्या उपासनेच्या बळावर हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यामुळे प्रत्येक प्रसंगात देवाने त्यांचे रक्षण केले हे आपण इतिहासातून शिकलो आहे.

हिंदू मुलींना खोट्या प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे धर्मांतरण करण्याचे षडयंत्र रचले जात आहे. अनेक ठिकाणी अशा घटना दररोज समोर येत आहेत. त्यामुळे आपण स्वतःच्या रक्षणासाठी सिद्ध होण्याची हीच वेळ आहे. शारीरिक, मानसिक क्षमतेसोबत आध्यात्मिक बळ वाढवून स्वरक्षणार्थ सिद्ध व्हा, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीचे सुनील क़दम यांनी केले. ते समितीच्या वतीने नवीन पनवेल यथील साईबाबा मंदिर येथे संपन्न झालेल्या शौर्य प्रशिक्षण शिबिरात बोलत होते.


### कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

जा.क्र. : कुबनप/उद्यान/१९२/२०२५–२६ दिनांक :– ०६/१०/२०२५

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. १५/२०२५-२६**

कुळंगाव बदलापूर नगरपरिषद जिल्हा–ठाणे यांजकडून खालील कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील वार्ड क्रमांक २४ मधील उद्याने १ वर्षासाठी देखभाल व संगोपन करणे. | रु.९,९३,६००=०० | रु.१०,०००=०० | रु.११८०=०० | १ वर्ष |
| २ | कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील वार्ड क्रमांक ३० मधील व्हर्टिकल उद्यान दुरुस्त करणे. | रु.४,९८,३२४=०० | रु.५,०००=०० | रु.५९०=०० | १ महिना |

**सदर निविदेबाबत चा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.**
१) ई निविदा विक्री संच ठिकाण http//mahatender.gov.in दि.७/१०/२०२५ ते १४/१०/२०२५ दुपारी ३.०० वा.
२) ई निविदा धारकांनी ई निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक १४/१०/२०२५
३) मुख्याधिकारी कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांचे कार्यालयात दिनांक १५/१०/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता ि निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष मुख्याधिकारी यांच्या दालनात उघडण्यात येतील.
**निविदा फॉर्म प्राप्त करण्याच्या व भरण्याच्या अटी व शर्ती खाली नमूद केल्याप्रमाणे राहतील.**
अ) महाराष्ट्र शासनाचे बांधकाम विभाग अथवा सक्षम खात्याचे नोंदणी प्रमाणपत्र नोंदणी ठेकेदार
ब) आयकर विवरणपत्र, GST प्रमाणपत्र.
क) उपरोक्त कामाकरिता निविदा सादर करताना सर्व करासहित निविदा भरावी.
ड) कामाचे अनुभव प्रमाणपत्र
इ) निविदा संदर्भात नगरसेवकांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे परिशिष्ट अ प्रमाणे प्रतिज्ञापत्र
उ) शपथपत्र ५०० रु च्या स्टॅम्प पेपरवर कागदपत्रा संबंधी
**४) वित्तीय बोलीचा लिफाफा क्रमांक २**
अ) मूळ प्रतीतील दरपत्रक
५) प्राप्त निविदा स्वीकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

शिक्का

सही/–
मुख्याधिकारी
कुळगाव बदलापूर नगरपरिषद
कुळगाव



### जाहीर नोटिस

दि. ०७ ऑक्टोंबर २०२५

ग्राम पंचायत देवद ता. पनवेल यांचे वतीने सर्व अधिकृत ठेकेदारना कळविण्यात येत आहे की, ग्राम पंचायत देवद कार्यालयात देवद कार्यक्षेत्रात ग्राम निधी अंतर्गत खालीलप्रमाणे विकास कामांसाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपली निविदा सीलबंद लिफाफ्यात बंद करून दि. ७/१०/२०२५ ते १४/१०/२०२५ पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर कराव्यात. आलेल्या निविदा दि. १४/१०/२०२५ रोजी दुपारी १२.०० नंतर उघडण्यात येतील. यावेळी संबंधित ठेकेदारांनी उपस्थित राहावे कोणतीही १ अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निधीचा स्त्रोत | वित्तीय वर्ष | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | देवद अंगणवाडी वाढीव काम करणे. | ९,६०,९४३ | ग्रामनिधी | २०२५/२६ | ६ महीने |

**अटी व शर्ती खालील प्रमाणे :**
१). कोरी निविदा दि. ०८/१०/२०२५ ते १०/१०/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळेल.
२) कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पाहण्यास मिळेल.
३) इसाऱ्या रक्कम रोखीने न भरल्यास पहिल्या बिलातून कपात केली जाईल
४) निविदा फी ना परतावा समजावी.
५) मूल्यांकन शासकीय नियमाप्रमाणे मूल्यांकणातून आयकर (टिडीएस) २%, जिएसटी, २% सेस १%, मंजूर विमा, १%, सुरक्षा अनामत ५% असे कपात करणेत येईल.
६) वर्क ऑर्डर प्रमाणे काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारकडून काम करून घेतले जाईल व त्यास होणाऱ्या खर्चास आपण जबाबदार राहणार.
७) मा. उपअभियंता बांधकाम व पाणीपुरवठा यांनी दिलेल्या मूल्यांकना प्रमाणे कामाचे बिल अदा करण्यात येईल.
८) कामाचे बिल अनुदान उपलब्ध निधिनुसार याद केली जाईल.
९) कामाचे मूल्यांकन आणण्याची जबाबदारी ठेकेदारची राहील.
१०) अर्ज ज्याच्या नावे मंजूर होईल, त्यांनी नियमाप्रमाणे ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक आहे.

वरील अटी मान्य असणाऱ्यानेच निविदा सादर करावी.

सही/–
श्री.विनोद वामन वाघमारे
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत देवद
ता. पनवेल, जि. रायगड



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे आष्टे, तहसील–पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार कांताबाई मोतीराम पाटील यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**
मौजे आष्टे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील
जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रु. पै |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक हे. आर. प्रती | पोटखराबा हे. आर. प्रती | एकुण क्षेत्र हे. आर. प्रती | |
| ५६/२/अ | १ | ०-३०-६० | ०-०२-५० | ०.३३.१० त्या पैकी विकदार यांचे मालकीचे क्षेत्र ०.१६.५५ | ३.३२ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/१०/२०२५

**कार्यालयीन पत्ता**
शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

सही/–
ॲड. स्वप्निल व्यं जाधव
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकिल)



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–

**मौजे मुठवली बुद्रुक, ता.रोहा, जि. रायगड येथिल......**

| मालक नांव | गट नं | एकूण क्षेत्र हे आर | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री. राम सखाराम कापसे | ५२ | जिरायत ००–४१–०० पो.ख.००–०८–०० एकुण ००–४९–०० | २.१९ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

**पनवेल.**
**दिनांक :– ०७/१०/२०२५**

सही/–
ॲड.पी.जी. दाभाडे

**पत्ता :–** रा. फ्लॅट नं.४०२, बी.वींग, चौथा मजला, साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर, डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२१०९ मोबा नं.९२७२७१३९५६



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, माझे अशिल साई पुजा को. ऑप. हौ. सोसायटी तर्फे मुख्य प्रवर्तक श्री. देविदास कोंडाजी डोंगरे यांनी खाली तक्त्यात नमुद केलेली मिळकतीचे मालक श्री. वरदराजन उर्फ अशोककुमार काशिनाथ नैनार यांचे कडुन कायम स्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे. माझे अशिल विकत घेत असलेल्या क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.....

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे– शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.चौ. मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २०६/ब | ०–२७–८० | १.६६ |

सदर मिळकत विकत घेणेकामी माझे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक यांचे सोबत दि. १७/०३/२०२५ रोजीचा सामंजस्य करार देखिल निष्पादीत केलेला आहे. माझे अशिलांना हे खात्रीलायकरित्या समजले आहे की श्री. वरदराजन उर्फ अशोककुमार काशिनाथ नैनार हे सदर मिळकत त्रयस्थ इसमास विकणेच्या प्रयत्नात आहेत. सदर मिळकतीबाबत श्री. वरदराजन उर्फ अशोककुमार काशिनाथ नैनार यांनी माझे अशिलांसोबत यापुर्वीच व्यवहार केलेला असल्यामुळे आणि सदर व्यवहाराबाबत ठरलेलया मोबदला रक्कमेपैकी काही रक्कम देखिल स्विकारलेली असल्यामुळे सदर मिळकतीमध्ये माझे अशिलांचे हक्क हितसंबंध निर्माण झाले आहेत.

सबब, माझे अशील या जाहीर नोटीसीद्वारे असे जाहीर करत आहेत की, सदर मिळकतीबाबत श्री. वरदराजन उर्फ अशोककुमार काशिनाथ नैनार हयांच्या सोबत माझे अशिलां व्यतिरीक्त अन्य कोणीही व्यवहार केल्यास सदर व्यवहार माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, आणि सदर व्यवहाराबाबत विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करणे माझे अशीलांस भाग पडेल आणि त्याचे परिणामांस श्री. वरदराजन उर्फ अशोककुमार काशिनाथ नैनार तसेच इच्छुक खरेदीदार जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :– ०६/१०/२०२५**

सही/–
ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी

**कार्यालयीन पत्ता :–** गाळा नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपीग कॉम्पेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड मोबाईल नं. ८०९७३९९३३१
ई मेल आय.डी.– dsk@840gmail.com

# भारतीय महिला क्रिकेट संघानेही पाकिस्तानला चारली धूळ!

## वर्ल्डकपमध्ये सलग दुसरा विजय

**कोलंबो : वृत्तसंस्था**

महिला एकदिवसीय विश्वचषकाचा सहावा सामना रविवारी कोलंबो येथील प्रेमादासा स्टेडियमवर खेळवण्यात आला. या सामनात भारताच्या संघाने पाकिस्तानवर ८८ धावांनी विजय मिळवला. यामध्ये दीप्ती शर्मा आणि क्रांती गौड यांची कौतुकास्पद कामगिरी राहिली. पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने नाणेफेक जिंकून पहिले गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारताच्या सलामीवीर फलंदाज प्रतिका रावल आणि स्मृती मानधना यांनी भारतीय संघाला चांगली सुरुवात करून दिली.

प्रथम फलंदाजी करताना भारत २४७ धावांवर ऑल आऊट झाला. संघाकडून हरलीन देओलने सर्वाधिक ४६ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तान १५९ धावांवर ऑल आऊट झाला. गोलंदाजीत दीप्ती



शर्माने तीन विकेट्स घेतल्या, तर क्रांती गौरनेही फक्त २० धावा देऊन तीन विकेट्स घेतल्या. हा भारतीय संघाचा विश्वचषकातील सलग दुसरा विजय आहे. २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात निराशाजनक झाली. मुनीबा अली फक्त दोन धावांवर बाद झाली.

गोलंदाजीत भारताकडून दीप्ती शर्माने तीन बळी घेतले, तर क्रांतीने फक्त २० धावांत तीन बळी घेतले. स्नेह राणानेही दोन बळी घेतले. पाकिस्तानविरुद्ध भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. स्मृती मानधनाने फलंदाजीत चांगली कामगिरी केली नाही, तिने ३२ चेंडूत २३ धावा केल्या. प्रतिका रावललाही चांगल्या सुरुवातीचा फायदा उठवता आला नाही, ती ३७ चेंडूत ३१ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. कर्णधार हरमनप्रीत कौरनेही तिच्या फलंदाजीने चाहत्यांना निराश केले. ३४ चेंडूंचा सामना केल्यानंतर हरमन १९ धावांवर बाद झाला, त्याने खूपच खराब शॉट खेळला.

दरम्यान, मोठा शॉट खेळण्याच्या प्रयत्नात ४६ धावा करून हरलीन देओलने आपली विकेट गमावली. जेमिमा रॉड्रिग्जनेही चांगली सुरुवात केली आणि नंतर ती ३२ धावांवर बाद झाली. दीप्ती शर्माने ३३ चेंडूत २५ धावांचे योगदान दिले. शेवटच्या षटकांमध्ये रिचा घोषने फक्त २० चेंडूत ३५ धावांची जलद खेळी करत संघाला २४७ धावांपर्यंत पोहचवले होते.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय वुशूसाठी निवड

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वुशूमध्ये कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

४ आणि ५ ऑक्टोबर या दोन दिवशी वुशू स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर आणि ऑल मुंबई सबअर्बन वुशू असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वुशू स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास दोन सुवर्ण, तीन रौप्य व चार कांस्य मेडल मिळाले आहेत.

जिया गुरुनाथ वासकर आणि इशिता प्रशांत शिंदे या दोघांची निवड राज्यस्तरीय वुशू स्पर्धेसाठी झाली आहे. सर्व विजेत्यांचे व क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील आणि संभाजी जाधव




यांचे प्राचार्या निशा नायर अभिनंदन करत कौतुक केले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ.एस.टी.गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# राष्ट्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेसाठी सुभाष पाटील, तेजस माळी यांची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोलीस हेडक्वार्टर जम्मू काश्मिर, केंद्रीय खेळ मंत्रालय आणि तायक्वांडो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित पोलीस गेम्स राष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धा पोलो मैदान श्रीनगर जम्मू - काश्मिर येथे १० ते १४ ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. या स्पर्धेसाठी रायगडचे सुपुत्र तायक्वांडोचे आंतरराष्ट्रीय पंच व ७वी डिग्री ब्लॅक बेल्टप्राप्त सुभाष पाटील यांची स्पर्धा प्रमुख म्हणुन निवड झाली आहे.

पंच म्हणुन तेजस माळी (१२ वेळा राष्ट्रीय सुवर्णपदक विजेता)ची निवड झाली आहे. याशिवाय खेळाडु म्हणुन नवी मुंबई पोलीस मयुरी खरात हिची निवड झाली आहे. या तिघांची निवड झाल्याबद्दल रायगड तायक्वांदो असोसिएशन, तायक्वांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) पदाधिकारी, प्रशिक्षक आणि आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील,




पनवेल महापालिका माजी सभागृह नेता परेश ठाकूर यांनी अभिनंदन केले तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

# वॉरियर्स क्लबच्या जिल्हास्तरीय लाठी काठी व दांडपट्टा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय लाठी महासंघ व ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन यांच्याशी संलग्न असलेल्या येथील वॉरीयर्स क्लब ह्या लोकप्रिय प्रशिक्षण संस्थेच्या वतीने लाठी-काठी व राज्यशस्त्र दांडपट्टा ह्या अस्सल मराठी मातीतील पारंपारिक खेळांच्या जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

स्पर्धेमध्ये एकूण ५० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. पुढील काही दिवसांमध्ये संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय लाठी काठी व राज्यशस्त्र दांडपट्टा स्पर्धेसाठी पात्रता चाचणी म्हणूनदेखील या स्पर्धा महत्वाच्या ठरल्या. या जिल्हास्तरीय स्पर्धेचे उद्घाटन रविवार ५ ऑक्टोबर २५ रोजी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील



एम.एन.एम.विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स च्या प्रांगणात झाले.

समारंभास क्लबचे अध्यक्ष सागरकुमार रंधवे, मुख्य प्रशिक्षक ओमकार रंधवे, स्टेट बँक ऑफ इंडिया बेलापूर शाखेचे असिस्टंट जनरल मॅनेजर भूषण पटले, क्रीडा शिक्षिका वर्षा नलावडे, ऋतुजा रंधवे, रेणुका रंधवे, वैशाली रंधवे, प्रशिक्षणार्थी स्पर्धक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी क्लबचे अध्यक्ष सागरकुमार रंधवे यांनी ब्रिटीश साम्राज्याला हादरवून सोडणाऱ्या आद्यक्रांतीगुरू लहुजी साळवे यांच्या देशप्रेमाने ओथंबलेल्या क्रांतीकारी शौर्य परंपरेचा समृद्ध वारसा जपण्याचाही प्रयत्न आपण करायला हवा, असे आवाहन केले.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी भारत सरकारचे निवृत्त अधिकारी एस.एस.जैन यांचेसह रेणू जैन, गुंजन मिश्रा, भूषण पटले, मयूर गावडे, विजयकुमार भोईटे आदी मान्यवरांचे हस्ते विद्यार्थ्यांना सुवर्ण, रजत आणि कांस्यपदके वितरित करण्यात आली.

'वॉरियर्स क्लब'च्या एन.आर.आय. कॉम्प्लेक्स, सीवूड्स, नवी मुंबई येथील शाखेमध्ये वयाच्या ८० व्या वर्षीदेखील अत्यंत उत्साहाने लाठी काठीचे प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी मिस्टर जैन हे सर्वांना प्रेरणादायी ठरावे, असे उदाहरण आहे. या वेळी मिस्टर जैन यांनी आपण स्वतः प्रशिक्षक ओमकार रंधवे यांचेकडून प्रशिक्षण घेताना या खेळाचा आनंद लुटतो असे सांगून विद्यार्थ्यांनी या खेळाच्या माध्यमातून स्वतः सक्षम होत आपल्या कुटुंबाच्या संरक्षणासह एकप्रकारे देश कार्य करित आहोत अशी भावना जोपासण्याचे आवाहन केले तसेच येणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत ओमकार रंधवे, सागरकुमार रंधवे, ऋतुजा रंधवे, वैशाली रंधवे, रेणुका रंधवे आणि माऊली परमार यांनी रेफरी म्हणून काम केले. मुख्य प्रशिक्षक ओमकार रंधवे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

# धोनीच्या नेतृत्वाखाली खेळायला न मिळाल्याची खंत -सूर्यकुमार

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने हैदराबादमधील एका कार्यक्रमात सांगितले की, भारतीय संघात महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली खेळण्याची संधी न मिळाल्याची खंत त्याला कायम राहील. ३५ वर्षीय सूर्यकुमारने २०२१मध्ये विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. त्याने देशांतर्गत क्रिकेटपासून राष्ट्रीय टी-२० संघाच्या नेतृत्वापर्यंतचा प्रवास सांगताना विविध भारतीय कर्णधारांसोबत खेळण्याचा अनुभवही सांगितला.

नुकताच दुबई येथे आशिया चषक जिंकून देणाऱ्या सूर्यकुमारने धोनीच्या नेतृत्वाखाली खेळण्याची




संधी हुकल्याबद्दल आपली निराशा व्यक्त केली. धोनी भारताचा कर्णधार असताना त्याच्या नेतृत्वाखाली खेळण्याची माझी खूप इच्छा होती, पण मला ती संधी मिळाली नाही. आयपीएलमध्ये मात्र त्याच्याविरुद्ध खेळताना मी त्याला अनेकदा विकेटकीपिंग करताना पाहिले. तो खूपच शांत स्वभावाचा आहे. त्याच्याविरुद्ध खेळताना मला एक गोष्ट शिकायला मिळाली, दबावाच्या क्षणी शांत राहणे. तो खेळाकडे पाहतो, आजूबाजूला काय चालले आहे ते पाहतो आणि मग निर्णय घेतो.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये येण्याचा सूर्यकुमारचा प्रवास मोठा होता. त्याने २०१०मध्ये मुंबईसाठी देशांतर्गत क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात केली, पण त्याला आंतरराष्ट्रीय पदार्पण करण्यासाठी एका दशकाहून अधिक काळ वाट पहावी लागली. त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पदार्पण २०२१मध्ये अहमदाबाद येथे विराट कोहलीच्या नेतृत्वाखालील इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात झाले, मात्र त्या पहिल्या सामन्यात त्याला फलंदाजीची संधी मिळाली नव्हती.

कोहलीबद्दल सूर्यकुमार म्हणाला, मी विराटच्या नेतृत्वाखाली पदार्पण केले. विराट खूप कडक शिस्त पाळणारा आहे. तो तुमच्या मर्यादांना पुढे ढकलतो आणि सर्वोत्तम कामगिरीची अपेक्षा करतो. सर्वच कर्णधारांना खेळाडूंकडून सर्वोत्तम कामगिरी हवी असते, पण तो थोडा वेगळा होता.

### रोहित शर्मा प्रेरणादायी कर्णधार

मुंबई इंडियन्स आणि भारतीय संघात रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना सूर्यकुमारचे करिअर अधिक बहरले. बार्बाडोसमधील टी-२० विश्वचषक २०२४च्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने शानदार कॅच घेतला आणि संघाला विजेतेपद मिळवून दिले. रोहितच्या कर्णधारपदाचे वर्णन करताना सूर्यकुमार म्हणाला, रोहितच्या नेतृत्वाखाली मी आयपीएल आणि भारतासाठी खूप क्रिकेट खेळलो. तो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.

# 'सीकेटी'च्या पल्लवी कणसेची वुशू स्पर्धेत राज्यस्तरीय निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि मुंबई उपनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बीएमसी स्कूल, कांदिवली येथे झालेल्या १९ वर्षांखालील मुले व मुली वुशु स्पर्धेत नवीन पनवेलमधील सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयातील पल्लवी अशोक कणसे (१२वी कॉमर्स) या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

पल्लवीची छत्रपती संभाजी नगर विभागीय क्रीडासंकुल गारखेडा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याचप्रमाणे अजय जालिंदर सत्रे (१२वी कॉमर्स) व रिया राजेश मोरया (१२वी कॉमर्स) या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यार्थ्यांनी केलेल्या चमकदार



कामगिरीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# हॅन्डबॉल स्पर्धेत नवी मुंबईतील शाळांचा प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेस शालेय क्रीडा स्पर्धांकरिता स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा प्राप्त झालेला आहे. त्यानुसार क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे यांचे सहकार्याने नवी मुंबई महापालिका जिल्हास्तरीय शालेय 'हॅन्डबॉल' क्रीडा स्पर्धा २०२५-२६ उत्साहात झाल्या.



हॅन्डबॉल खेळाच्या १४, १७ व १९ वर्षाआतील मुले व मुलींच्या गटातील स्पर्धांचे न्यू होरायझन वर्ल्ड अकॅडमी, सेक्टर-२०, कोपरखैरणे येथे शाळेच्या मैदानावर नमुंमपा क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नवी मुंबई शहरातून विविध शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातून मुलामुलींच्या तब्बल ७१संघ सहभागी झाले होते. स्पर्धेच्या शुभारंभप्रसंगी न्यु होरायझन वर्ल्ड अकॅडमी, कोपरखैरणेच्या प्राचार्या सुजाता मेनन, नमुंमपा क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन समिती सदस्य धनंजय वनमाळी, ठाणे जिल्हा हॅन्डबॉल असोसिएशन सचिव चैताली चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

१४ वर्षाआतील मुलांच्या गटातील अंतिम सामना विब्ग्योर हायस्कूल, ऐरोली आणि डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कुल, नेरूळ यांच्यात झालेल्या सामन्यात विब्ग्योर हायस्कूल, ऐरोली शाळेच्या संघाने २:१ असे ०१ गोलने जिंकून मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

१७ वर्षाआतील मुलांच्या गटातील अंतिम सामनाअव्हलॉन हाईटस इंटरनॅशनल स्कूल, वाशी आणि रायन इंटरनॅशनल स्कूल, नेरूळ यांच्यात झालेल्या अंतिम सामन्यात अव्हलॉन हाईटस इंटरनॅशनल स्कूल वाशी शाळेच्या संघाने २:१ असे ०१ गोलच्या फरकाने अजिंक्यपद पटकावून मुंबई विभागीयस्तर स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. १९ वर्षाआतील मुलांच्या गटातील अंतिम सामना क्राईस्ट अकॅडमी कोपरखैरणे आणि साईनाथ कॉलेज वाशी यांच्यात झालेल्या अतिशय चुरशीच्या अंतिम सामन्यात क्राईस्ट अकॅडमी कोपरखैरणे शाळेच्या संघाने १:० असे ०१ गोलने जिंकून मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

या स्पर्धेतील १९ वर्षाआतील मुलींच्या गटात अंतिम अव्हलॉन हाईटस इंटरनॅशनल स्कूल वाशी आणि तिलक ज्युनिअर कॉलेज,नेरूळ यांच्यात झालेल्या चुरशीच्या सामन्यात अव्हलॉन हाईटस इंटरनॅशनल स्कूल वाशीच्या संघाने २:१ असे ०१ गोलने जिंकून मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com